# माणूस

साप्ताहिक

१० जानेवारी १९७० । ४० पैसे

के. डी. मालवीय

चंद्रजित यादव

राजा दिनेशसिंग

नंदिनी सत्पथी

डॉ. शंकर दयाळ शर्मा

चंद्रशेखर

मोहन धारिया

या तरुण तुर्कांच्या
मुलाखतींच्या आधारे
माणूस प्रतिनिधी
शरद कृष्णन्
यांनी सादर केलेला
मुंबई काँग्रेसचा आलेख
—पुढील अंकी

# मुखपृष्ठ खुलासा

मी मुंबईच्या इंदिरा कॉंग्रेस अधिवेशनाला माणूस प्रतिनिधी म्हणून हजर राहिलो. या अधिवेशनाचा वृत्तांत के. डी. मालवीय, मोहन धारिया, चंद्रजित यादव, राजा दिनेशसिंग, नंदिनी सत्पथी, शंकर दयाळ शर्मा, चंद्रशेखर इत्यादींच्या मुलाखतींद्वारा सादर करण्याचे योजले होते. दुर्दैवाने मुलाखतींची टाचणे असलेली माझी ब्रीफकेस गहाळ झाली. या आधाराशिवाय लेख लिहिण्याचा प्रयत्न केला. तथापि विषयाला व वरील व्यक्तींच्या विचारांना न्याय देऊ शकेन असे वाटले नाही. अपुऱ्या माहितीवर आधारलेला लेख प्रसिद्ध करण्यापेक्षा विषय बाजूला ठेवणे पसंत केले.

—शरद कृष्णन्

इंदिरा कॉंग्रेसविषयी योजलेला मजकूर वरील कारणास्तव पुढील अंकी येऊ शकणार नाही. मुखपृष्ठ तयार झाल्यावर ही हकीकत समजली. पुढील अंकी वाचकांची निराशा होऊ नये म्हणून याच अंकी खुलासा करणे प्रशस्त वाटले.

—संपादक

१० जानेवारी १९७०

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक बत्तीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

वाचकांच्या प्रतिक्रियेची आपण नोंद घेता व क्वचित इष्ट बदलपण करता म्हणूनच एक सूचना करीत आहे. आपल्या साप्ताहिकात कथा हवीच का? इतर भाषेतील भाषांतरीत कथा व हेरकथा वाचल्या जातात पण अंकात असलेल्या इतर कथांची पाने उलटून पुढे जाणारेच वाचक जास्त आहेत. कथा-लेखकांना इतर मासिके साप्ताहिकांचे फार मोठे क्षेत्र मोकळे आहे. आपण त्या जागेत काही चांगली सदरे देऊ शकता किंवा नवीन सदरे सुरू करू शकता. सारांश कथा ह्या पानांचा अपव्यय वाटतो.

डिसेंबर, २९ परशुराम मालशे, मुंबई

कालच 'माणूस'चा २७ डिसें. अंक वाचला श्री. यशवंत सरदेसाई यांची व्यंगचित्रे चांगली आहेत. परंतु पत्र लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे पृ. ६४ च्या समोर जे व्यंग चित्र आहे त्यात एक चूक आढळते. डॉक्टरच्या कन्सल्टिंगरूममध्ये बसल्यावर झुलत्या दरवाजावरील अक्षरे उलटी दिसावयास पाहिजे ती चित्रात सरळच दाखविली आहेत.

या बाबतीत टाइम्स ऑफ इंडियामध्ये येणारी आर. के लक्ष्मणची व्यंगचित्रे पाहण्या लायक असतात. श्री. सरदेसाई यांनी घेतलेल्या कल्पना चांगल्या आहेत.

डिसेंबर, ३१ विवेक कुंटे, मुंबई

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मा र्ग

श्री. ग. माजगावकर

सुपे येथील कामात आणखीही एक दोष होता. ते मदतभावनेने सुरू झालेले होते. १९६६ साली महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला होता. शासनाप्रमाणेच विविध सामाजिक संस्थांनीही दुष्काळ-निवारण कार्यात भाग घेतलेला होता. सुपे हा नेहमीचाच दुष्काळी भाग. रतनलाल भंडारींसारखा प्रामाणिक व तळमळीचा कार्यकर्ता येथील दैनंदिन कामाची जबाबदारी उचलण्यास तयार होता म्हणून 'माणूस प्रतिष्ठान'चे काम येथे सुरू करण्यात आले. परंतु कामामागील भूमिकेचा व्यवस्थित प्रचार अगाऊ झाला नाही. धर्मार्थ काम अशीच कामावरच्या मजुरांची, ज्या छोट्या शेतकऱ्याच्या शेतात विहीर खणली जात होती त्याची व ज्या आसपासच्या दोन-चार शेतकऱ्यांना विहीरीचे पाणी दिले जाणार होते त्यांची भावना होऊन बसली. काम चालू झाल्यावर, ज्यांची खूप शेतीवाडी आहे व पैसाही ज्यांच्याजवळ कमी नाही, अशांनीही नवीन विहीरींसाठी हात पसरला. हा एक चीड आणणारा अनुभव होता. मजुरीत वाढ व्हावी अशा मागण्या मजुरांकडून वरचेवर पुढे येत होत्याच. मालकही जादा मजुरी जिकडे मिळेल तिकडे अधूनमधून जात होता. सामुदायिक पुरुषार्थाची भावना निर्माण होऊ शकली नाही. स्वावलंबी होण्याची धडपड चालू झाली नाही. भंडारी होते तोवर कामामागील हा विचार निदान सांगितला तरी जात होता. पुढे उद्योगानिमित्त त्यांनीही स्थलांतर केले. त्यामुळे विहीर जरी कायम राहिली व तिचे पाणी जरी वापरले गेले तरी तिच्यामागील विचार, भावना पुसली गेली. नुकतेच भंडारी तिकडे गेले होते. त्यांनी पत्रातून वस्तुस्थिती कळवली आहे. आपल्या सर्वच ग्रामीण भागावर सध्या भिकाऱ्या रोगाची साथ कशी पसरत आहे याचे मोठे विदारक चित्र त्यांनी रेखाटले आहे. पत्रातील महत्त्वाचा तेवढा भाग देतो –

श्री. माजगावकर यांना,
स. न. वि. वि.

सुप्याला एका विहीरीचे छोटेसे काम सुरू करताना केवढ्या मोठ्या आशा उराशी बाळगल्या होत्या. गेल्या दोन वर्षात देशाचे राजकीय, सामाजिक चित्र बदलले आहे. एक फसवे मृगजळ सर्वत्र पसरत चालले आहे. मधल्या काळात खूप पाणी वाहून गेले. अनेकांचे बुरखे फाटले. काहींनी नवे धारण केले. एक गतिमान संभ्रम, भरकटणे, फार तर फरफटणे म्हणा हवे तर, सुरू आहे. माझ्याही जीवनात गाढीने रूळ बदलले आहेत. पण...

शेजारीच पडलेल्या वृत्तपत्रातील मजकुरामुळे मी आज पूर्वीसारखाच अस्वस्थ आहे. कुठेतरी आमच्या स्वाभिमानाला खग्रास ग्रहण लागले आहे. ते वृत्त म्हणते, त्याचा भावार्थ तरी असा आहे – आम्हाला पी. एल्. ४८० चे एखाद्या गुंगी आण-णाऱ्या औषधासारखे व्यसन जडले आहे. करारामागून करार आपण करीत आहोत. अमेरिकेतून वस्तू आयात करण्याची आम्हाला सवय जडली आहे. आपण १९६८ च्या डिसेंबरमध्ये एक करार केला. २·३ लाख टन गहू मागविला. त्यापेक्षा थोडा लहान करार एप्रिल १९६९ मध्ये केला. वस्तूंच्या संख्येतही आता वाढ होऊ लागली आहे. नुकताच आणखी एक करार करून तीन लाख टन गहू, ४९,००० टन खाद्य तेल आणि १००,००० कापडांच्या गाठी आपण मागवीत आहोत. या सर्व मालाची किंमत आहे १४३·६३ कोटी. या सर्वांचा अर्थ एकच आहे. तो म्हणजे अधिक गुलामी. अधिक आर्थिक पारतंत्र्य.

सुप्याला विहीर काढताना डोळ्यासमोर एक ध्येय होते. माणसांना स्वतःच्या पायावर उभे रहावयाला शिकवायचे. अन्न स्वतंत्रतेच्या आंदोलनात कुठेतरी मुहूर्ताची कुदळ टाकायची. या छोट्या प्रतीकांच्या रूपाने या देशात, निदान शिव-रायाची परंपरा मिशीला तूप लावून सांगणाऱ्या महाराष्ट्रात, समर्थ अशा स्वावलंबी स्वातंत्र्याची गुढी उभारावयाची. या इवल्याशा प्रारंभाच्या वेळेपासून या विहीरीचे सुईणपण मी आजीबाईच्या काळजीने केले. आज विहीर तेथेच आहे. विहीरीत पाणीही आहे, मधून मधून शेतीला पाणीही दिले जाते; पण जो माणूस आपण घडवू इच्छित होतो, तो घडलाच नाही. या भागातल्या दुष्काळी परिस्थितीची आम्ही खूप दवंडी पिटली. या साऱ्यांचा परिणाम काय झाला आहे हे आता स्पष्ट शब्दात सांगण्याची वेळ आली आहे.

यामुळे सुपे विभागाला शासनाने दुष्काळात 'अ' वर्ग दिला आहे. (दुष्काळी प्रदेशांचीही म्हणे आता ग्रेड ठरविण्यात येते!) देशभर असलेल्या ठिकाणांचा शोध घेत असलेल्या ख्रिश्चन मंडळींची गिधाडदृष्टी नेमकी येथेच येऊन पडली. अधि-काररूढ अदूरदर्शी नेतृत्वाला यातच आयती संधी चालून आली. फुकट धान्यावर तलावाच्या योजना घाईघाईने सुरू झाल्या. पावसात काही तलाव फुटलेदेखील.

एका गावाला तर (देउळगाव रसाळ) एकाच लहानशा ओढयावर तीन तीन तलाव तयार करण्यात आले. त्यामुळे जिल्हा परिषदेने सुरु केलेले लहान लहान प्रकल्प मागे पडले. कामावर हजेरी लावली की गहू आणि तेलाचा रतीब सुरु होतो. पुणे जिल्हापरिषदेचा सुपे पावठाणचा तलाव तर त्यामुळेच गेली तीन वर्षे पूर्ण झाला नाही. पावपन्ना झालेल्या 'जी हुजूर' मंडळींनी मुकादमी पत्करून एक नवीन पकड सगळयांवर कायम केली आहे.

आता इथली मंडळी दुष्काळाला भीक घालणार नाहीत. सारा हवाला 'कासा' संस्थेच्या शिरावर. या मंडळींनीही आपली नखे हळू हळू बाहेर काढावयास सुरुवात केली आहे. आता संस्थेचा अधिकृत माणूस आल्याशिवाय आठवडयाचा गव्हा-तेलाचा पगार होत नाही. लवकरच 'प्रभूची करुणा' भाकल्याशिवाय 'पगार' होणार नाही असे सांगितले जाण्याचा दिवस दूर नाही. आता तर या योजनेची 'कायण' पुरंदर तालुक्यालाही मोठया जाहिरातबाजीसह चालू करण्यात आली आहे. माजगावकर, कदाचित तुम्हाला आश्चर्य वाटेल; पण इथला मजूरदेखील पूर्वीसारखा अंग मोडून काम करीत नाही. हा अर्धशेतमजूर स्वतःचे शेतही धडपणे कसत नाही. तो म्हणतो, 'हतं कितीबी काम केलं तर चार पैसं थोडंच पदरात पडायच्यात. साळं, गव्हाच्या तलावाव निस्तं हजेरी दावली की रोज लागू होतुया.'

तुम्ही मागे जेव्हा अन्न स्वतंत्रता संचलनात भाषणे करीत होतात, माणूसमध्ये लिहीत होतात, डॉ. दांडेकर माणूसमध्ये लिहीत होते, तेव्हा क्षणभर वाटायचे हे सारे बुद्धीला आव्हान आहे. पण आज गावी परत आल्यावर समाजाचे एक भयाण आणि लाचार रूप पहायला मिळतं आता लाचारी हळू हळू रक्तात भिनायला लागली आहे.

परवा एका कार्यकर्त्याशी बोलायचा प्रसंग आला. नुकतीच त्याने टोपी बदलली आहे. पहिल्यापेक्षा स्वारी जरा ऐटबाज वाटत होती. माझ्या कानाला लागून तो सांगत होता, 'साथी, दुसरा इलाजच नव्हता. तिकडे गेलो म्हणून तर हा गव्हाचा बंधारा होतोय बघा.'

एक प्रकारची घृणा, शिसारी मला गिळून टाकण्याचा प्रयत्न करीत होती आणि तो कार्यकर्ता मला आपण आपल्या पूर्वीच्याच राजकीय विचारांवर भक्कम असल्याचे असहाय्य मुद्रेने समजावून सांगत होता.

परवा 'माणूस'च्या विहीरीजवळचा एक शेतकरी मला हाक मारून सांगत होता – 'शेठ, आवंदा हुरडा खाया या. सायबास्नीबी बोलवा.' (साहेब म्हणजे श्री. ग. मा., जेवढे पॅंट घालतात ते सारेच साहेब.)

"का ? आपल्या विहिरीचे पाणी दिलेस वाटते ?"

"अजून न्हाय. पर आता द्यावं म्हणतुया."

" विहिरीत पाणी किती आहे ?"

" पाऊसकाळांत बरं होतं. तांब्या कलांडल्यावानी वाटायचं. आता असल पुरूसभर."

" म्हणजे अजून बरेच आहे. एक वेढा येईल की."

" ईल म्हंजे. इलच."

" विहिरीतले दगड गोटे काढलेस ?"

" लईंदी इचार करतुया, पर ह्या भानगडींनी जमतच न्हाय."

" भानगड ? ...... कसली रे."

" न्हाय. पोटापायी कुणी कुणी तलावाव जात्यात. आमच ह्ये असचंच."

हॉटेलातल्या पोराला स्पेशलची ऑर्डर जाते.

मी शून्य चेहऱ्याने त्याला विचारतो, " विहिरीतले गबाळ काढायला किती दिवस लागतील ? आठवडाभर ?"

" अवं येडं का शानं तुमी. दिड दोन दिसांच्या म्होरचं काम न्हाय."

" गबाळ काढल्यावर पाणी किती वाढेल ?"

" वाढलं की अर्धा पुरूस."

" मग ?" पुन्हा माझा मख्ख प्रश्न आणि चेहऱ्यांवर न आवरता येणारा वैताग.

" आता ह्ये माझ्या एकल्यानं व्हनार हाय व्हय. आता एवढ केलंसा, पोटं राहल्यालं ........."

पुन्हा एक भिकारी मला गिळण्याचा प्रयत्न करते. मी कसाबसा उठतो. तरा-तरा चालायला लागतो. हॉटेलातल्या चहाच्या कपाजवळ एक जंतू वळवळत असतो. विहिरीतले स्वच्छ, सुंदर जल वाकुल्या दाखवून नाचत असते. तेवढ्यात हॉटेलच्या मागून दोनचार बाया बाजाराला येताना दिसतात. मी उगीचच समो-रच्या पर्णहीन बाभळीच्या झाडाकडे पहात उभा रहातो. कुणीतरी विचारते, " कवा आलासा ?"

" परवाच आलो वहिणी." माझ्या उत्तराने वहिणी मोकळेपणाने बोलायला लागतात. जवळच्या बाया अवघडून उभ्या असतात. डोळ्यात भोळे 'कवतिक' असते.

" कोकण मानावल्यालं दिसतंया ... घराकडं आला न्हाईसा ? हिरीवर येळपाला घालच की."

" नाही वहीणी. मला यावस वाटत नाही." माझे बोलणे त्यांना मुळी 'उमग-तच' नाही.

त्या पुन्हा विचारतात, " आमच्याव रागावलां तुमी ?"

" नाही हो. पण येऊन काय करू. उगीच विहीर पाडली."

" उगीच का ? जाणारं येणारं वाईच टेकतंया. भाकर तुकडाबी खातंया. तुमास्नी नी साहेबास्नी मोप आसिर्वाद देत्यात पघा."

"अहो पण ती विहीर धान्याला पाणी देण्यासाठी साहेबांनी काढलीय नां ?"

"ते खरं हाय वो. पर ह्यॅच्या अकलंत दिवा लागल तवा. चांगलं पाणी हाय. जमिन हाय. पर ह्यास्नी हिंडाया हुवं गावातनं. आमची आपली बायकांची म्हन हाय 'दैव देतं न् कर्म नेतं.' चांगलं सौताच्या जमिनीत राबावं, रक्ताचा घाम करावी, कुणाच फट् म्हणून घेऊ नाई, शिवार फुलवावं. पर समदी उलथल्यात फुकाटच्या गव्हावं."

असच आणखी काही काही रतनलालने आपल्या ३ नोव्हेंबर ६९ च्या पत्रात मला कळविलेलं आहे.

पश्चिमेचे, श्रीमंत भांडवलशाही देशांचे दुसऱ्या गरीब देशांना गुलाम करण्याचे हे रुपेरी तंत्र. फुकट खायला प्यायला घालून माणूस लुळापांगळा करून ठेवायचा; कामाची त्याची प्रवृत्तीच नाहीशी करून टाकायची. दुसऱ्याकडे नोकर म्हणून तर सोडाच, स्वतःच्या शेतावरही राबण्याचा तो हळूहळू कंटाळा करू लागतो. श्रीकैलास ते सिंधुसागर अन्नस्वतंत्रता संचलनात जवळजवळ प्रत्येक सभेत मी सांगत असे : पंधरा मिनिटे दिवसाकाठी काम करून पिशवीभर गहू आणि बाटलीभर तेल मिळते म्हणून तुम्ही खुशीत असाल. पण काम संपल्यावर तुमचे हातपायच गेल्याचे तुम्हाला आढळून येईल. ग्रामीण भागातील बेकारांना काम मिळते म्हणून या योजना आपले पुढारी आणतात. उत्पादनवाढ होते म्हणून विचारवंतही असल्या योजनांचे स्वागत करतात. उत्पादन कदाचित वाढतही असेल. पण उत्पादक संपतो. क्रयशक्ती वाढली तरी कार्यशक्तीचा ऱ्हास होतो. मग ऐषारामात किंवा दारिद्र्यात लोळत राहणे एवढाच मार्ग उरतो. आपण गरीब होतो म्हणून इंग्रजी राज्य आले नाही. स्वतंत्र कर्तबगारीची आपली धडपड संपलेली होती म्हणून साहेबाला हा देश चटकन गिळता आला. महत्त्व धडपडीला आहे, श्रीमंतीला वा गरिबीला नाही. जे धडपडतात तेच जिवंत असतात, राहू शकतात. बाकीचे मेलेले. फुकटचा गहू खाऊन असे मरू नका. हातपाय हलवलेत तर आहे त्यातूनही खूप काही निर्माण होऊ शकते. मदतीची सध्याच्या प्राथमिक अवस्थेत तरी मुळीच गरज भासणार नाही. 'चालत्याला शक्ति येई, मार्गही अन् सापडे'...... आपल्यालाही एखादा मार्ग सापडल्याशिवाय राहणार नाही. प्रथम स्वतंत्र धडपड मात्र सुरू झाली पाहिजे.

गोदाराणीच्या लाल टापूतही, डहाणू-तलासरी महालात श्रमशक्तीचे असे खच्चीकरण चालूच आहे. प्रकार आणि पद्धत फक्त वेगळी. सावकाराकडचे कामाचे माप व्यवस्थित न भरण्याची वृत्ती एकवेळ समजू शकते. पण कूळकायद्यामुळे प्राप्त झालेल्या म्हणा किंवा अतिक्रमणे करून ताब्यात घेतलेल्या जमिनींच्या मशागतीबाबत विपरीत लाल प्रचार ही खास चिंतनीय बाब आहे. गरीब आदिवासीला जमिनी

मिळवून देण्यासाठी चळवळींचा आटापिटा. पुढील मशागतीची मात्र उपेक्षा, नव्हे विरोध व टिंगलटवाळी. 'विहीरी कशासाठी खणायच्या? पिकवलेली वांगी दलाल-व्यापारी-सावकाराच्या घशात दोन-चार आणे किलो भावाने धाडण्या-साठीच ना? यापेक्षा 'त्यांनाच' खणू द्यात विहिरी, करू द्यात जमिनींच्या मशागती. वेळ येताच आपण अशा तयार जमिनी ताब्यात घेऊन टाकू. आताच कशाला ही गद्धेमेहनत! सरकारी उंबरठे झिजवा, लाच द्या, कर्जाचा बोजा डोक्यावर घ्या-कशासाठी हा उपद्व्याप? प्रथम पिळवणूक संपली पाहिजे. यासाठी राज्य बदलले पाहिजे. लाल बावट्याशिवाय हे कोणीही करू शकणार नाही. एकदा जनतेचे राज्य स्थापन झाल्यावर'...

उघडे मैदान जमावाने तुडुंब भरलेले असते. भोवतालच्या झाडीतून कलत्या सूर्याची किरणे काळ्या शरीरांवर कोसळत राहतात- ढालींचा चमचमणारा एक समुद्रच. एखादी फिआट-अँबेसडर बाजूच्या रस्त्यावरून धुरळा उडवीत सुसाटत निघून जाते. जंगलची हवाच मुळात माणसाला बेभान करणारी. मनाच्या वारूला मोकाट सोडणारी. त्यात ताडीमाडीचा चढलेला कैफ. पसरलेल्या पंखांसारखे समोर दिसणारे लाल निशाण. वृक्ष, आज्ञेची वाट पाहणाऱ्या सेनाप्रमुखांसारखे खडे असतात.


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन



१० जानेवारी १९७०

ारा घोघावत असतो. वक्ता गर्जत असतो. पिळवणुकीची जहाल वर्णने. क्रांतीचा जोष. उद्याच्या स्वर्गाची सोनेरी स्वप्ने. बस्स. काय हवे आणखी उत्साह ओसंडायला. हे तप्त रसायन एकदा डोक्यात घुसले की, सहसा त्याचा अंमल उतरतच नाही. कष्ट करून मोठा हो या सांगण्यात फक्त उपदेश आहे. त्यामुळे तो कंटाळवाणा, रटाळ ठरतो. समुदायचे समुदाय त्याने उठत–उसळत नाहीत. पण ' हे समोरचे वाडे–बंगले तुझेच आहेत, तुझ्याच श्रमावर या बागा अशा लगडलेल्या आहेत. घे ताब्यात, आण लुटून '– हे शब्द विलक्षण धुंदी चढविणारे आहेत. काहीही घडवायचे, जोपासायचे, उभारायचे म्हणजे तपश्चर्या हवी, वर्षानुवर्षांचे एकाग्र परिश्रम हवेत. पण इतरांनी उभारलेले, जोपासलेले, घडविलेले केवळ झडप घालून बळकवायचे, लूट म्हणून आपल्या भोगासाठी दडपायचे, यासाठी केवळ हवा एखादा महत्त्वाकांक्षी नायक, एखादे बेहोषी निर्माण करणारे तत्त्वज्ञान. बौद्धांचा अपवाद वगळता, समतेसाठी म्हणून, उसळलेल्या आजवरच्या सर्वच जागतिक आंदोलनात हे रसायन वापरले गेलेले आपल्याला आढळून येईल. ' कृण्वन्तो विश्वमार्यम् 'मध्येही हे असंस्कृत आवाहन असले पाहिजे. मध्यपूर्वेत उगवलेला हिरवा चांद एक शतक पुरे होण्यापूर्वीच थेट स्पेनपर्यंत पश्चिमेकडे फडफडत जातो, यातील रहस्य काय केवळ इस्लामी तत्त्वांची श्रेष्ठता ? गझनीचा महंमद हिंदुस्थानात येतो तो लूट गोळा करण्यासाठी, मूर्ती फोडण्यासाठी. इस्लामच्या समतास्थापनेशी त्याला कर्तव्य नसते. अर्थात लूट वजा कुराण ही केवळ पशुता. शकहूणांच्या टोळधाडी आणि इस्लामची आक्रमणे यात म्हणूनच फरक पडला. चालू शतकात आशियात फैलावणाऱ्या कम्युनिझमचेही असेच एक अर्धसुसंस्कृत – अर्धरानटी, पण उन्मादक रसायन तयार झालेले आहे. गुलामीच्या जोखडाखाली शतकानुशतके ठेचून-पिळवटून निघालेल्या आशियातील कोटयवधी भुकेकंगाल जनतेला मुक्तीचा एक नवा किरण या तत्त्वज्ञानात दिसला हे नाकारता येत नाही; पण हेही नाकारले जाऊ शकत नाही, की यशप्राप्तीसाठी या तत्त्वज्ञानाच्या पाईकांनी अत्यंत हीन अशा मानवी प्रवृत्तींना आवाहन केलेले आहे. माणसातील पशूला चाळवून संस्कृतीला काळिमा फासणारी कृत्ये त्याच्या हातून घडविलेली आहेत.

' माणूस जेव्हा जागा होतो ' तेव्हा तो असे वागत नाही.

लाल महालात माणसाला आलेली जाग आणखीही एका क्षेत्रात दडपली जात आहे....

(क्रमशः)



# दिल्ली

## दिनांक ३० डिसेंबर

### सुभगसिंगांचे समाजवादाशी संगनमत ?

अहमदाबाद – मुंबई – पूर्व काळात अप्पा – इंदिरा भांडण विकोपाला गेले असतानाही दोन्ही पक्षात एखादा दुबळा आवाज एकीची भाषा बोलत असे. दोन्ही गोटातले श्रेष्ठी असल्या चुटपुटत्या आवाजाकडे दुर्लक्ष करीत होते, आणि बाहेरच्या बघ्यांच्या मते ही एकी आता एकाच परिस्थितीत शक्य होती, व ती म्हणजे अहमदाबाद – मुंबईला खेळल्या जाणाऱ्या चुरशीच्या सामन्यात एक गोट दुसऱ्या गोटापुढे खूपच तोकडा पडणे. परंतु प्रतिनिधींच्या हजेरीचा तपशील सोडला तर भाऊगर्दी जमविण्याच्या बाबतीत दोन्ही गट तुल्यबळ आहेत असे दिसून आल्याने आता काँग्रेसच्या एकीची संभावना कायमची संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही. पण एकीकडे ही शक्यता संपुष्टात आल्याबरोबरच दुसरीकडे एक शक्यता वाढीला लागली आहे, व ती म्हणजे एका काँग्रेसचे डाव्या पक्षाशी व दुसऱ्या काँग्रेसचे उजव्या पक्षाशी अधिकाधिक संगनमत होत जाणार.

अर्थात आपल्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या चाणक्यनीतीला अनुसरून अशा मित्राचा राजकीय रंग कसाही असला तरी त्याला जवळ करायची दोन्ही काँग्रेस पक्षांची तयारी आहे हे सुज्ञास सांगणे नलगे. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेश व बिहारमध्ये आपल्या काँग्रेसचा जम बसविण्यासाठी प्रसोपा व संसोपा या दोघांशीही हातमिळवणी करण्याचा मनसुबा सुभगसिंगांनी बोलून दाखविला आहे. संसोपीय नेत्यांशी तर त्यांनी या बाबतीत प्राथमिक बोलणीही गेल्या आठवड्यात केली. पार्लमेंटच्या बजेट अधिवेशनात इंदिरा – सरकार कोलमडेल अशी सुभगसिंगांना आशा वाटते, म्हणून ते त्या अधिवेशनात आपली बाजू मजबूत करायच्या खटपटीला लागले आहेत.

प्रस्तुत बोलण्यात सुभगसिंगांनी म्हणे असा आग्रह धरला आहे की, या दोन्ही

समाजवादी पक्षांनी इंदिराजींच्या विरुद्ध उभे ठाकण्यात एकमत केले पाहिजे. उलट या पक्षाच्या मते सहकार्याचा तहनामा व्हायचा म्हणजे आधी मूलभूत धोरणाच्या बाबतीत मतैक्य झाले पाहिजे. इंदिरा–सरकार उलथून पाडण्याच्या कामी संसो- पीय मंडळींनी प्रसोपीय मंडळींपेक्षा अधिक स्पष्टवक्तेपणा दाखविला आहे. संसोपा पार्लमेंट–पक्षाचे प्रमुख रवी राय यांनी स्पष्टपणे बोलून दाखविले आहे की, इंदिरा–सरकार उलथून पाडण्याचे आपले धोरण कायम आहे, कारण हे सरकार परंपरागत शासनयंत्रणेचे प्रतीक आहे. ते पुढे म्हणाले या कामी सुभगसिंगांशी किती सहकार्य करता येईल हे पहायला आम्ही तयार आहोत. पण कार्यक्रमाचे म्हणाल तर आमचे मूलभूत धोरण, निदान त्यातले प्रमुख मुद्दे तरी सुभगसिंगांच्या काँग्रेस- कडून स्वीकारले जावेत असा आम्ही शक्य तेवढा प्रयत्न करू. या बाबतीतला अंतिम निर्णय आणखी आठ-दहा दिवसांनी भरणाऱ्या संसोपाच्या राष्ट्रीय संमेलनात घेतला जाईल.

एकीकडे ही सहकार्याची भाषा चालू असताना दुसरीकडे दोन्ही काँग्रेस पक्षांना सारख्याच प्रमाणात नाक मुरडण्याची संधी या संसोपीय नेत्याने सोडलेली नाही. विरोधी काँग्रेसचे दोषवर्णन : अहमदाबादच्या काँग्रेस अधिवेशनात भाषा, मालमत्ता, परराष्ट्रीय नीती, विशेषत: चीन व पाकिस्तानविषयक धोरण या गोष्टी स्पष्ट आखण्यात आल्या नाहीत. हे महत्त्वाचे मुद्दे होते. सरकारी काँग्रेसचे दोषवर्णन : या मंडळींना क्रांतिकारक धोरण अमलात आणता येणार नाही. त्यांचा दहा– कलमी कार्यक्रम म्हणजे समाजवाद नाही. चीन व पाकिस्तानविषयक धोरणही स्पष्ट नाही.

प्रसोपाची प्रक्रिया काय ? पार्लमेंटमधल्या प्रसोपागटाचे प्रमुख द्विवेदी म्हणतात, काँग्रेसच्या दोन्ही गटांशी काय संबंध ठेवायचे हे आमच्या पक्षाने अजून ठरविलेले नाही. हा निर्णय फेब्रुवारीत बडोद्याला पक्षाचे संमेलन होईल तेव्हा घेण्यात येईल. परंतु प्रसोपाचे प्रमुख मुद्दे स्वीकारले गेले तरी तेवढ्यावर सहकार्य करता येईल असे नाही.

ते काही असले तरी विरोधी काँग्रेसने बजेट अधिवेशनात आपले एकूण धोरण काय असावे हे ठरविण्यासाठी नऊ सदस्यांची एक समिती नेमली असून या समितीचे कामकाज ताबडतोब सुरू झाले आहे. सुभगसिंग हे अर्थात या समितीचे प्रमुख असून तिच्यात श्यामनंदन मिश्र, अशोक मेहता इत्यादी मंडळी आहेत. पार्लमेंटच्या दोन सेशन दरम्यानच्या काळात उपयोगी पडणारे 'टॉकिंग पॉइंटस्' तयार करण्या- साठीही सहा सदस्यांची दुसरी एक समिती नेमण्यात आली आहे. एकूण विरोधी काँग्रेस आता विरोधविकासवादाच्या मागे लागली आहे – म्हणजे विरोधाचा विकास कसा करता येईल या वादात पडली आहे.

## अहमदाबादी अतिरथींचा वाग्बाणांचा वर्षाव

अहमदाबादचे अतिरथी राजधानीत परतल्यावर त्यांनी इंदिरा-काँग्रेसवर पुनश्च वाग्बाणांचा वर्षाव सुरू केला आहे. अर्थात् असल्या गालिप्रदानात तथ्यांश फारच थोडा मिळतो, तरीही काही मुद्दे लक्षात घेण्यासारखे आहेत. पहिली तोफ सोडली ती विरोधी ए. आय. सी. सी. चे चिटणीस शामधर मिश्र यांनी. शिवीगाळ वजा करता त्यांचा पहिला मुद्दा : चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यावर आता त्याचा कसा राष्ट्रीय उपयोग होणार आहे हे सांगायच्या आधीच ही मंडळी उरलेल्या सर्व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या गोष्टी करीत आहेत. दुसरा मुद्दा : संस्थानिक-तनखा प्रकरणी एक बनवाबनवीची योजना शिजत असून तिच्यामुळे संस्थानिकांचा अधिकच लाभ होणार आहे. ती योजना म्हणजे संस्थानिकांना त्यांच्या वार्षिक तनख्याच्या दसपट रक्कम पेन्शन म्हणून मिळेल असा बाँड द्यायचा, पण रक्कम वीस वर्षांत चुकती करायची. पण असा बाँड दिला तर संस्थानिकांना तो हवा तेव्हा वटविता येईल व त्यांचा फायदाच होईल.

दुसरा हल्ला सुभगसिंगांचा. त्यांचा पहिला वार : काँग्रेस का फुटली याचे इंदिराजींनी कानपूरच्या भाषणात एक कारण दिले, सोव्हिएट पत्र 'प्रावदा 'ला दिलेल्या मुलाखतीत दुसरे कारण दिले, तर पश्चिम जर्मन वार्ताहराला तिसरेच दिले. यावरून तात्त्विक कारणाचा केवळ बुरखा होता हे सिद्ध होते. दुसरा टोला : या वर्षी भारताचे आर्थिक भाग्य इंदिराजींनी आपल्या हाती घेतले, पण याच वर्षी देशाची आर्थिक परिस्थिती अधिक बिघडली आहे. योजनेसाठी मिळणारा सरकारी पैसा कमी झाला आहे. आर्थिक वाढ मंदावली आहेच, पण जी काही होत आहे तीही परकीय सावकारांच्या बळावर होत आहे. (येथे सिंगांनी बरेच आकडे पेश केले आहेत.)

तिसरा हल्ला अर्थात खुद्द अप्पाजींचा. राजधानीत परतल्यावर त्यांनी पत्रकारांशी केलेल्या बातचितीतले काही मुद्दे : इंदिराजी देशाला साम्यवादाकडे खेचत नेत आहेत यात तिळमात्र शंका नाही. ज्या प्रकारे रेडियोचा व काही वर्तमानपत्रांचा दुरुपयोग केला गेला तो साम्यवादी-हुकुमशाही पद्धतीला साजेसा होता. सरकारी काँग्रेसजनांकडून तत्त्वनिष्ठेची नव्हे तर इंदिराजीनिष्ठेची शपथ घेण्यात आली.

विरोधी काँग्रेसचे आणखी एक श्रेष्ठी नुकतेच प्रकट चिंतन करते झाले, हे म्हणजे अप्पा-इंदिरा बेबनावाला बळी पडलेले संजीव रेड्डी. त्यांचे काही मुद्दे : सिंडिकेट या शब्दाचा मला अभिमान आहे. नेहरूंच्या मृत्यूच्या चार वर्षे आधी त्यांची प्रकृती ढासळली तेव्हा देशाच्या हिताचा विचार करण्यासाठी कामराज, अप्पा, अतुल्य घोष व आपण अशी चौकडी जमली. हीच ती सिंडिकेट सदाशा

माथाहून आले. शास्त्रींच्या निवडीच्या वेळी एकमत झाले, पण इंदिराजींच्या वेळी झाले नाही. कामराज यांनी केलेली त्यांची निवड चुकीची आहे असे त्या वेळी आम्हालाच नव्हे तर कृष्ण मेननलाही वाटले. इंदिराजी आपल्या भाषणात पुनः पुनः आपल्या वडिलांचा व आजोबांचा उल्लेख करीत आहेत हे कोठवर योग्य आहे ? मुंबई-मेळाव्यानंतर मंत्रि-मंडळात वाढ होणार, कारण 'बरीच मंडळी नाराजी आहेत.' मध्यावधी निवडणुका होण्याची चांगलीच शक्यता आहे.

## 'स्वतंत्र' विचारमंथन

येली दहा वर्षे सतत खांद्यावर वाहिलेली स्वतंत्र पक्षाची अध्यक्षीय धुरा रंगा यांनी नुकतीच मसानींवर सोपविली आहे त्या निमित्ताने रंगांनी राजधानीतल्या पत्रकारांबरोबर केलेल्या वार्तालापातले काही विचार : मध्यावधी निवडणुका होण्याची बऱ्याच कारणांमुळे शक्यता आहे. प्रधानमंत्राणी आपल्या साथीदारांची मजबूत पाळण्यासाठी नाही नाही म्हणत आहेत, पण परिस्थिती त्यांना भाग पाडील. तेव्हा विरोधी पक्षांनी तयारीत असणे चांगले. जनसंघ तर उघड तयारी करीत आहे. नंबुद्रीपादांच्या बोलण्यावरून दिसते की, इंदिराजींना सर्वकाळ सर्व साम्यवाद्यांच्या पाठिंब्यावर विसंबून राहता येणार नाही. द्रविड मुन्नेत्र कळहम्-बद्दल तेच म्हणता येईल. सरकारी काँग्रेसने आखलेला आर्थिक कार्यक्रम पार पाडायला बरेच पैसे लागतील. साहजिकच मध्यम व खालच्या वर्गावरील कराचे ओझे वाढेल. साम्यवादी व इतर पक्षांना हे मानवणार नाही.

रंगांनी आता स्वतःला 'गांधीप्रणीत समाजवादा'ला वाहून घ्यायचे ठरवले आहे. त्यांच्या पक्षाला हा समाजवाद मान्य झाला तर विरोधी काँग्रेसशी त्यांची सोयरीक जमू शकेल. तसे पाहिले तर स्वतंत्र पक्षाला कोठल्याही समाजवादाचे वावडे आहे. परंतु त्याला बऱ्याच आर्थिक व राजकीय प्रश्नांवरचे आपले मूळ धोरण नुकतेच बदलावे लागले आहे.

असो. या वार्तापत्राचा बहुतेक भाग मुलाखती, भाषणे व संभाषणे देण्यात खर्च झाला आहे. परंतु राजधानीतलेच काय पण आपल्या देशातलेच एकूण राज-कारण 'बोलाचाच भात व बोलाचीच कढी' या प्रकारचे असते त्याला ऐकणाऱ्याने काय करावे ?

— अनामिक

चौथी सचित्र आवृत्ती

□ □

# राजा शिवछत्रपति

□ □

ब. मो. पुरंदरे


□ □

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□ □

राजहंस प्रकाशन
पुणे

१० जानेवारी १९७०



# मौजे गांधीनगर

ऑफिसमध्ये बसलो असताना दुपारच्या वेळी टेलीफोनची घंटा खणखणली.

हातात रिसिव्हर घेऊन मी म्हटले, “हॅलो.”

‘माणूस’चे माजगावकर बोलत होते, “माझ्या मनात एक विचार आला — अहमदाबादच्या काँग्रेसला तुम्ही जाता का ?...वि. शं. पारगावकर बरोबर यायला तयार आहेत.”

हातात रिसिव्हर ठेवून क्षणभर नुसताच उभा राहिलो. वर्किंग कमिटीच्या बंगलोर बैठकीपासूनचा गेल्या चार पाच महिन्यांचा इतिहास मनापुढून दौडत गेला, पण तरीही मी म्हटले, “अहमदाबाद काँग्रेसला !...आहे काय तिथं ?... जावंस वाटत नाही....बोलून चालून बुढ्ढी काँग्रेस ती !”

रिसिव्हरमधून माजगावकरांच्या किंचित् हसण्याचा आवाज ऐकू आला, "अहो, बुद्धी आहे, म्हणून तर तुम्हाला जा म्हणतोय्...तुम्ही स्वतःला काय जवान समजता?" एक सेकंदभर आम्ही दोघेही हसलो. मग ते एकदम गंभीर झाले. "खरंच जा तुम्ही. तुम्ही जिला बुद्धी काँग्रेस म्हणता, तिलाच मी शेवटची काँग्रेस म्हणतो...तुम्ही ललित लेखक आहात...नवं जीवन घडत आहे. ते तुम्ही बघायलाच हवंय."

मी नकारार्थी काहीतरी बोलणार होतो इतक्यात तेच पुढे म्हणाले, "आता काही बोलू नका. तुम्ही जात आहांत असं मी धरून चालतो." त्यांनी फोन बंद केला आणि मी उगाच बसलो.

आकाशात सगळीकडे स्वच्छ असावं, छान उन पडलेलं असावं आणि एकदम

# मी काँग्रेसला जातो

## एक

श्री. ज. जोशी

काहीही पूर्वसूचना न देता सोसाटयाचं वारं सुटावं आणि सारं आसमंत धुळीने भरून जावं, तसं माझ्या मनाचं झालं. शांती ढळली. चमत्कारिक कोलाहल माजला. एखाद्या खडयानं भिंग फुटावं तसा मनाचा तोल गेला. सिगरेट पेटवून मी नुसताच खुर्चीत बसून राहिलो.

'तुम्ही ललित लेखक आहात...नवं जीवन घडत आहे...ते तुम्हाला बघायलाच हवं' कानात शब्द गुणगुणत होते. बरा वाईट (खरे तर बराचसा वाईट!) लेखक आहे हे खरं. गोष्टी-बिष्टी लिहितो. पण त्या लेखनाला जीवनाचा स्पर्श झाला आहे का?...लिहितो ते खरं आहे का?...का ते नुसतेच मनचे मांडे आहेत?...जीवनाची उदाहरणं माझ्या पात्रांकरवी सोडवतो हे खरे. पण ती उत्तरं

बरोबर आहेत का नाहीत, याची कधी चौकशी केली आहे का ?...स्वतःचं स्वतः-लाच काही कळेनासं झालं.

'नवे जीवन घडत आहे !'...तसं तर नवं जीवन प्रत्येक क्षणाला घडतच असतं. जुना क्षण मरत असतो, तेव्हाच नवा क्षण जन्माला येत असतो. जीवनमृत्यूचं हे सूत्र सारखं वळलं जातच असतं. त्यात मुद्दाम बघण्याजोगं काय आहे ?...लेखकानं नवं जीवन बघावं, हा अट्टाहास का ?...जीवनाची नदी मृत्यु-गोलातून वर्तुळाकृती वहात आहे. स्वतःच्या जागी उभं राहून हातातल्या पेल्यात अनुभवाचे पाणी जेवढे आपाततः येईल, तेवढ्यावरच लेखकानं समाधान मानावं, का नदीकिनाऱ्यावर हिंडून ठिकठिकाणच्या पाण्याची चव घेण्याचा अट्टाहास करावा ?

'नवे जीवन घडत आहे !'...भारतात किंवा महाराष्ट्रात खरोखरच नवे जीवन घडत आहे का ? राजकीय किंवा सामाजिक क्षेत्रात मोठमोठे उत्पात खरोखरच होत आहेत का ?.. बदल होत असलेच तर ते घडवून आणण्यात काँग्रेसचा हात किती ?... काँग्रेसचा आणि माझा संबंध काय ?...काँग्रेस बदल घडवून आणत असेल ! पण त्याचं सोयरसुतक मला कशाला ?...ही काँग्रेस कदाचित शेवटचीही असेल ! पण त्याची खत मला कशाला ? काँग्रेसचं आणि माझं नातं काय ?... काँग्रेस माझी कोण आहे ? किंबहुना मीच कोण आहे ?...वेदांतामध्ये 'कस्त्वं ?' 'कुतः आयातः ?' वगैरे प्रश्नमालिका मुमुक्षूला विचारत असतात. 'अहम् ब्रह्मास्मि'... 'ब्रह्मापासून निघालो, नि ब्रह्माकडे चाललो.' अशी त्या प्रश्नांची उत्तरे आहेत. पण पुन्हा ब्रह्म म्हणजे काय हा प्रश्न उरतोच. त्याबद्दल विचार करायला लागलं, म्हणजे मन चक्रावतं. काँग्रेसचही तसंच आहे.

मी एक सामान्य सुशिक्षित आहे. पन्नाशी उलटलेली आहे. राजकारणात भाग घ्यावा, आपल्या हातून काही त्याग घडावा, देशासाठी तुरुंगातल्या हालअपेष्टा सहन कराव्यात, असं बालपणात नि तारुण्यात फार वाटे. परंतु तितकं धैर्य माझ्या अंगात नव्हतं. देशासाठी सर्वस्वाचा होम करण्याचे स्वप्नरंजन मन करू शकत होतं; परंतु त्या होमाची झळ लावूनदेखील सहन करण्याची माझी ताकद नव्हती. माझ्या तरुणपणात मोठमोठे स्वातंत्र्यसंग्राम झाले. पण त्यात मी कधी विशेष भाग घेतला नाही. रानातल्या वणव्याकडे गावातून बघावे आणि स्तिमित व्हावे त्याच-प्रमाणे मी त्या स्वातंत्र्यसंग्रामाकडे पाहिले.

हे सारे मी मुद्दाम सांगत आहे. कोणत्याही देशातला सामान्य माणूस हा असाच असतो. स्वतःचा संसार सांभाळण्यातच त्याची सर्व शक्ति खर्च होते. दुसऱ्या तिसऱ्या गोष्टींचा तो विचार करत नाही. स्वतःच्या घरकुलातच तो रमलेला असतो. सामान्य माणसाच्या या आदर्शाप्रमाणेच मी आहे. त्यात लपवून ठेवण्याजोगे काही नाही.

प्रत्यक्ष राजकारणाचा आणि माझा संबंध नाही, त्याचप्रमाणे काँग्रेसचा आणि माझा संबंध नाही, असे आहे का ? मी काँग्रेसचा कोणीच नव्हे का ? ती बुद्धी

झाली – तिला शेवटची घरघर लागली, तर मला काहीच खंत वाटणार नाही, असं आहे का?

अहमदाबाद कॉंग्रेसला जायचं कबूल करून बसलो होतो. अजून दोन तीन दिवस बाकी होते. पण तेवढ्यात मन भ्रमलं होतं. कुठले कुठले विचार येत होते. कॉंग्रेसचं आणि माझं नातं काय आहे याचा मी शोध घेत होतो.

माझा सारा जन्म पुण्यात गेलेला. संस्कृतीचं नि राजकीय शिक्षणाचं हे केंद्र आहे. जाहीर सभा नाही असा इथे एक दिवसही जात नाही. माझ्या लहानपणी देखील घराघरात राजकारणाविषयी आणि समाज–सुधारणांबद्दल चर्चा चाले व वादंग माजत. परंतु एकवीस सालच्या गांधींच्या चळवळीचा महापूर येऊन गेल्यानंतर पुण्यात राजकारणाविषयी त्या मानाने कमी बोलले जाई. केळकरांच्या केसरीतील अग्रलेख घरातल्या किंवा वाड्यातल्या माणसांनी एकत्र जमून मोठ्याने वाचणे आणि त्यातील भाषाशैलीची व चिकित्सक बुद्धीची प्रशंसा करणे एवढेच एक राजकीय धर्मकृत्य होते. बाकी सगळा थंड कारभार होता. त्या वातावरणातच मी वाढलो.

'कॉंग्रेस' हे नाव प्रथम केव्हा ऐकले हे मला स्पष्ट आठवते. तीस साली मी नूतन मराठीत होतो. सुटीमध्ये खानदेशात शिरपूर येथे गेलो होतो. परत येताना एक दोन दिवस मुंबईत राहिलो होतो. आतेभावाबरोबर एका सकाळी सहज हिंडायला चौपाटीवर गेलो असताना मला प्रथम 'कॉंग्रेस' दिसली. तिरंगी झेंडा आकाशात फडकत होता. त्याच्या भोवती गांधी टोप्या आणि खादीचे सदरे घातलेले बरेचसे तरुण होते. पोलिसांनी त्यांच्या भोवती कड केलं होतं. 'महात्मा गांधी की जय!'...'हिंदी संपूर्ण स्वातंत्र्याचा जयजयकार असो.' वगैरे घोषणा ते तरुण देत होते थोड्याच वेळात पोलिसांनी त्यांना पकडले व एका मोठ्या काळ्या गाडीत नेऊन बसवले. पोलीस काळेच होते. परंतु त्यांचे अधिकारी लाल गोबऱ्या तोंडचे मस्तवाल टॉमी होते. त्या टॉमीजच्या हातात ऐटबाज छड्या होत्या. त्यांच्या छडीचा थोडासा इशारा जरी मिळाला तरी हजारो हिंदी लोक भयाने धूम ठोकीत. त्या झेंडेवाल्या तरुणांना पोलिस घेऊन गेले आणि राहिलेला समाज पांगवण्यासाठी त्यांनी सौम्य लाठीहल्ला केला. मी आणि माझा भाऊ लांब फूटपाथवर उभे होतो. परंतु आमची पळता भुई थोडी झाली.

त्या दिवसानंतर कानावर नवीन शब्द पडायला लागले आणि त्यांचे अर्थ प्रतीत व्हायला लागले. 'मिरवणूक'...'घोषणा'...'सत्य' 'अहिंसा' 'सत्याग्रह' 'लाठीमार' 'उपोषण' वगैरे शब्द त्या दिवसात कळले. चरखांकित तिरंगी ध्वज चौपाटीच्या वाळवंटात फडकताना प्रथम पाहिला तो मनात कायमचा ठसला. त्यानंतर चळवळीला आणि राजकारणाला प्रचंड वेग आला. कन्याशाळेसमोर एका वाड्यात कॉंग्रेस हाऊस होते. त्याच्या परसात झेंडावंदन झालेले प्रथम पाहिले.

'नव हिंदराष्ट्र झेंडया । प्रणामा घे या ।
नव्या मनूचे शिलेदार हे । नमिती तुज पाया । '

हे सूर तीन चार मुलींच्या कंठातून गाइले गेलेले अजूनही माझ्या मनात ठसलेले आहेत.

आम्ही मॅट्रिकमध्ये होतो. तेव्हा सत्याग्रहाची चळवळ जोरात सुरू होती. टिळकांच्या काळात गायकवाड–वाडयाचे पटांगण हेच तेव्हा मोठे समजले जात असे. पाच सात हजाराची गर्दी हीच तेव्हा 'प्रचंड' वाटे. मल्लाप्पा धनशेट्टी वगैरे चार लोकांना सरकारनं फासावर चढवले. तेव्हा शनवारवाडयापुढे वीस पंचवीस हजार लोकांची सभा झाली, आणि प्रचंड सभांचे नवे युग सुरू झाले.

त्या दिवसात ब्रिटिश सरकारविरुद्ध जनतेने स्वाभाविक आंदोलन सुरू केले होते. परंतु नाव कॉंग्रेसचे होते. त्यागाचे, हालअपेष्टांचे आणि देशभक्तीचे एकवटलेले प्रतीक म्हणजे कॉंग्रस होती. स्वराज्याची लोकांना तहान लागलेली होती आणि महात्मा गांधींच्या पुढारीपणाखाली कॉंग्रेस ती पुरी करेल असा विश्वास होता. एका दृष्टीनं राजकारणही सोपं होतं. संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास केला म्हणजे झाले अशी स्थिती होती. स्वातंत्र्याबरोबर इतर फार मोठया समस्या उत्पन्न होणार आहेत याची कल्पनाही नव्हती.

ब्राह्मण कुटुंबातला मी पुण्यातला मुलगा. घरचे वातावरण जुने व धार्मिक. हिंदुधर्माबद्दल जाज्वल्य आदर. मुसलमानांबद्दल मनातून तिटकारा. परंतु त्या दिवसात घरातल्या किंवा आसपासच्या ब्राह्मण लोकांच्या चर्चा जरी ऐकल्या तरीही कॉंग्रेसबद्दलचे प्रेमच दिसून येई. टिळकांचे पुढारीपण संपल्यामुळे, स्वतःच्या समाजाचे 'ग्लॅमर' नष्ट झाल्याची खंत काही लोकात असे. पण ती तितकीच. चौतीस पस्तीस साली पं. मालवीयांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात हिंदुमहासभेचे अधिवेशन भरले होते. त्या वेळी पंडितजींची मोठी मिरवणूक निघाली होती. मिरवणुकीत त्यांच्याबरोबर काकासाहेब गाडगीळही बसल्याचे आठवते. कॉंग्रेसच्या पोटातच तेव्हा हिंदुमहासभा होती हे उघड आहे. आर्थिक प्रश्नाबद्दल तर कोणतेच मतभेद नव्हते. दारिद्र्याचे सर्व खापर ब्रिटिश सरकारच्या माथी मारून राष्ट्रीय चळवळीतले लोक सुखाने रहात होते.

चळवळ संपली. गोलमेज परिषदा झाल्या. आणि सदतीस साली पहिल्या निवडणुकांचा हंगाम सुरू झाला. त्या वेळेपासून निरनिराळ्या प्रश्नांबद्दल विचार करण्यास कॉंग्रेसने सुरुवात केली. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद फार पूर्वीपासून आहे (वसिष्ठ आणि वाल्मिकी यांच्या भांडणापासून तो आहे असं म्हणतात) परंतु त्या वादाला शास्त्रीय स्वरूप कॉंग्रेसने दिले. ते स्वरूप देण्यातही अडाणीपणाचाच भाग जास्त होता. यच्चयावत सगळे ब्राह्मण हे सगळे, 'आहेरे' आणि सगळे ब्राह्मणेतर हे 'नाहीरे' अशी व्याख्या करण्यात आली. त्या काळात ब्राह्मणेतरांचा प्रचंड लोंढा

काँग्रेसवर आदळला असे म्हणण्यास हरकत नाही. हिंदु–मुसलमानांच्या प्रश्नाचेही तसेच ! त्या दिवसात या प्रश्नाला निराळे अधिष्ठान लाभले. मुसलमान हे 'भाऊ' आहेत असं झालं. आणि मोठ्या भावानं लहान भावाची नुकसान सोसूनही समजूत काढावी असं ठरलं.

काँग्रेसच्या पुढाऱ्यांचाही त्या दिवसात एक नवा प्रकार निर्माण झाला. पूर्वी ब्राह्मणेतर व अशिक्षित लोक राष्ट्रीय चळवळीत मुळीचही नव्हते. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व चळवळ, ब्राह्मण किंवा तत्सम जातीच्या वकिलांच्या हातात होती. झिरमिळ्यांची लाल पगडी घालून दिवसभर कोर्टात वकिली करावी आणि संध्याकाळी शनिवारवाड्यापुढे 'सैतानी' ब्रिटिश सरकारला शिव्याशाप द्यावेत असा प्रकार असे. हे पुढारीपण त्या दिवसात संपूर्णपणे उखडले गेले. अशिक्षित पण व्यवहारचतुर अशा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी काँग्रेस काबीज केली. त्यांचे सगेसोयरे आणि नातेवाईक खेडोपाडी पसरलेले असल्यामुळे ग्रामीण समाजाशी भावबंध निर्माण करणे त्यांना सहज शक्य झाले. खेड्यापासून शहरापर्यंत 'अशिक्षित' आणि विशिष्ट जातीच्या पुढाऱ्यांची साखळी त्यामुळेच निर्माण झाली. यच्चयावत सगळे ब्राह्मणेतर हे 'नाहीरे' ठरल्यामुळे काँग्रेसवर समाजवादाचा अभ्रा चढण्यासही अडचण पडली नाही. पूर्वीच्या पुढाऱ्यात आणि त्या काळच्या पुढाऱ्यात दुसराही एक फरक होता. महात्माजींच्या साध्या रहाणीचा प्रभाव त्यावेळी खरोखरच होता. खादी जिकडे तिकडे दिसायला लागली होती. पण तिच्यावर हल्लीप्रमाणे टिनो-पालची चकमकी चढलेली नव्हती.

हे सर्व रामायण घडत असताना 'मी' कुठे होतो? हे घडविण्यात माझा स्वतःचा हात अर्थातच नव्हता. मी होतो. निश्चच होतो. काठावर उभा राहून नदीकडे बघणाऱ्याचीच भूमिका माझी होती. परतु या सर्व वातावरणाचे परिणाम माझ्या मनाने शोषून घेतले होते. त्याने मी अस्वस्थ झालो होतो.

मी ब्राह्मण !...पण ब्राह्मण जातीची राजकारणातली नि समाजातली ठाकुरकी दिवसानुदिवस नाहीशी होत चाललेली मी बघत होतो. सर्व ब्राह्मण समाज त्या दिवसात अस्वस्थ होता. कोवळ्या वयात असून मी [illegible] असाच होतो. परंतु मी इतरां-सारखा नव्हतोही. काँग्रेसच्या सभातून मी नवे तत्त्वज्ञान ऐकत होतो. आचार्य जावडेकर किंवा पां. वा. गाडगीळ यांचे लेख वाचत होतो आणि त्यामुळे मला नवी दृष्टी लाभत होती. 'ब्राह्मण्य' हा एक वाळूचा किल्ला आहे. तो लवकरच संप-णार–संपायलाच पाहिजे, असं मला कळत होतं. इतर ब्राह्मणांप्रमाणे त्यामुळेच माझ्या मनात वैफल्याचा किंवा द्वेषाचा भाव निर्माण होऊ शकला नाही. हिंदु–मुसलमानांच्या किंवा अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाबद्दलही असंच म्हणता येईल. पुण्यात मुसलमान फार थोडे. मा[illegible] सर्व भा[illegible] मुसलमानांशी प्रत्यक्ष संबंध

## पुरंदऱ्यांची दौलत
## पुरंदऱ्यांची नौबत

मूल्य । साडेतीन रुपये

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन

कधीच आला नाही. पण तरीही मुसलमान व अस्पृश्य आपले भाऊ आहेत आणि देशात आपण गुण्यागोविंदाने रहायचे आहे हे मी कॉंग्रेसच्या सभांतून शिकलो. म. गांधी किंवा साने गुरुजी यांच्या लेखनाचा मनावर परिणाम न होणे हे अशक्य होते.

त्या दिवसात सगळं जगच नाविन्यानं रसरसलेलं होतं. आम्हा तरुणांपुढे नव विचारांचा पट दररोज उलगडला जात होता. 'जुने जाऊ दे मरणालागुनी ' ही भावना होती. हिंदु धर्म हा मागासलेला आहे असं वाटत होतं. साम्यवादी तत्त्वज्ञान प्रसारित होत होतं त्यामुळे नवा दृष्टिकोन उदयाला येत होता. सगळीच मजा होती.

या नवविचारांनी प्रेरीत होऊनच मी फैजपूर कॉंग्रेसला गेलो होतो. खेड्यात भरणारी ती पहिलीच कॉंग्रेस होती. नगर जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा एक प्रचंड मोर्चा फैजपूरला गेला होता. त्या बरोबरच आमच्यासारखे का ी युवक होते. नव्या घोषणा, नवे विचार, जगाच्या मांडणीविषयींचा नवा दृष्टिकोन !...सगळंच नवीन होतं.

अहमदाबाद कॉंग्रेसला जायची तयारी करीत असताना मला फैजपूर कॉंग्रेस दिसत होती. डोंगरावर उभं राहून मागे टाकलेल्या पाऊल वाटेकडे बघत असावं. त्याप्रमाणे मी फैजपूर कॉंग्रेसकडे बघत होतो. म. गांधी, जवाहरलाल नेहरू, पटेल नि सुभाषबाबू !...महाराष्ट्रातले शंकरराव देव, गाडगीळ, जेधे आणि साने गुरुजी ! ...एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे आणि रघुनाथराव खाडिलकर !...त्यांच्या भोवती पुढारीपणाचे वलय तेव्हा नव्हते. त्यावेळी ते तरुणच होते. परंतु त्यांच्या बद्दलच्या अपेक्षा फार होत्या.

अहमदाबादला जाण्यासाठी पुण्याला गाडीत बसल्यावर बराच वेळ डोळ्यापुढे जुनी दृश्ये तरळत होती. कॉंग्रेसचा सर्व इतिहास आठवत होता. दादाभाई नवरोजी किंवा लो. टिळक यांना आम्ही बघितलेले नव्हते. पण टिळक युगाच्या सरत्या संधि-कालात आमची पिढी जन्मली होती. एका दृष्टीने आमचं भाग्य फार मोठं होतं. अगदी लहानपणी पुण्याच्या कॅम्पमध्ये जायलादेखील भीती वाटे. रस्त्यावरून गोरा सोजिर जात असला तर बायका-मुली दारे-खिडक्या लावून घेत. इथल्या समाजात आम्ही वरिष्ठ होतो. कितीही मोठ्या वयाच्या ब्राह्मणेतर माणसाला ' अरेतुरे ' नं संबोधण्याची पद्धत होती. त्या काळापासून आजच्या काळापर्यंत आमच्या पिढीनं मजल मारली होती. ' गोरा ' माणूस तर आता दिसतच नव्हता. ब्राह्मण्य ही लप-वण्याजोगी किंवा लाज वाटण्यासारखी उपाधी होण्यापर्यंत आज पाळी आलेली आहे.

हे सर्व कोणी केले ?...क्रांतिकारकांनी ?...मवाळांनी ?...जहालांनी ?... का साम्यवाद्यांनी ?...काही सांगता येत नाही. या प्रत्येकाचा त्यात हात आहे. पण परिवर्तनाची संपूर्ण जबाबदारी यापैकी कोणाचीच नाही.

माझ्या मनाने सांगितले की हे सगळं कॉंग्रेसनं केलं. ' सागरे सर्व तीर्थानी ' असं म्हणतात. कॉंग्रेसचही तसंच आहे. जनचळवळीचे आणि निरनिराळ्या विचारांचे अनेकविध प्रवाह कॉंग्रेसगंगेला मिळालेले आहेत. त्यात काही नाही, असं नाही.

सनातनी आहेत, भांडवलवाले आहेत, समाजवादी आहेत, आणि कम्युनिस्ट आहेत. सर्व आहेतच. नाही असं कोणीच नाही.

गाडी मुंबईकडे चालली होती आणि मी काँग्रेसच्या प्रवाहाकडे पहात होतो. बनारसला गंगेच्या पात्रातून नौका चाललेल्या असतात तेव्हा आसपास निरनिराळे घाट लागतात अगदी थेट व्यासकाशीपासून! ... जिथं व्यासांनी महाभारत लिहिलं,...हरिश्चंद्रानं लाकडे फोडली,...त्या काळापासून तर अगदी अलीकडे, जिथे नेहरूंची आणि गांधींची रक्षा विसर्जित झाली, त्या ठिकाणापर्यंत सर्व ठिकाणं, एका फेरीत दिसतात. माझं मनही काँग्रेसवर बांधलेले निरनिराळे घाट–दादाभाई नवरोजींपासून नेहरूंपर्यंतचे–बघण्यात तल्लीन झालं होतं.

मी नि पारगावकर मुंबईत पोचलो. सहज म्हणून मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ऑफिसमध्ये गेलो. तिथे गोंधळाची परिस्थिती आढळली. स्पेशल गाड्या केव्हा निघणार, मुंबईहून किती लोक जाणार, वृत्तपत्राचा पास कुठे मिळेल, हे सांगायला कोणी तयारच नव्हतं. असंही वाटलं, की महाराष्ट्रातून अहमदाबादच्या अधिवेशनास जाणाऱ्यांबद्दल तियल्या अधिकाऱ्यांच्या मनातच काही संशय आणि शंका आहेत. किंबहुना कोणताही मराठी माणूस सिंडिकेटच्या काँग्रेसला जाईल, असं वाटतच नसावं.

संध्याकाळी गुजरात एक्स्प्रेस निघाली. मला नेहमी तिसऱ्या वर्गातून प्रवास करणे आवडते. जनतेचे खरे दर्शन तिथे होते. रात्री नऊ–साडेनऊपर्यंत गाडीतील निरनिराळ्या लोकांचे संवाद मी ऐकत होतो. जमेल त्याच्याशी बोलत होतो. पलीकडच्या बाजूला दोन-तीन सुशिक्षित गुजराथी तरुण आणि एक छान तरुणी बसली होती. सारा प्रवासभर ते राजकारणावर आणि काँग्रेसबद्दलच बोलत होते. यशवंतराव चव्हाण, सिंडिकेट, मुरारजीभाई, गुजराथचा दंगा वगैरे गोष्टींबद्दल ते तावातावाने बोलत होते. एक दोनदा मी त्यांच्या संभाषणात घुसण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी दाद दिली नाही. दुसऱ्या बाजूला एक सिंधी डॉक्टर बसले होते. ते काँग्रेसलाच निघाले होते. देशाचे पुढील मुख्यप्रधान यशवंतराव चव्हाणच आहेत असे ते म्हणत होते. मी स्वतः उत्तर हिंदुस्थानी आणि पंजाबी लोकात बराच हिंडलो आहे. मराठी माणूस भेटला की शिवाजीची स्तुती करायची असा त्यांचा शिरस्ता असतो. यशवंत स्तुतीचंही तसंच असावं, असा मला वास आला. मी "शेवटच्या काँग्रेसला निघालो आहे," असं त्या सिंधी डॉक्टरला सांगितल्यावर तो खूप हसला. 'शेवटची काँग्रेस' हा शब्दप्रयोग त्याला एकदम पटला. मागे कराचीला काँग्रेस झाली होती ती त्यानं लहानपणी पाहिली होती. पाकिस्तानातून निर्वासित होऊन निष्कांचन अवस्थेत तो भारतात आला होता. शेवटची काँग्रेस बघण्याइतकी उत्सुकतेची धुगधुगी त्याच्यात शिल्लक असावी हेच विशेष होतं. सिंधी डॉक्टर बराच थट्टेखोर होता. तो म्हणाला, "हिंदुस्थानचं राज्य करण्यासाठी गोरागोमटा इंग्लंडात शिकलेला एखादा नेहरूच लागतो. इंदिराजींचा मुलगा संजीव मोठा झाला की,

तो भारताच्या गादीवर बसेल. तोपर्यंत बाईच, 'डॉवेजर' राणी म्हणून राज्य करतील" माझ्या वरच्या बर्थवर एक पोरवयाचा गुजराथी व्यापारी होता. त्याचे शालेय शिक्षण बहुधा मुळीच झाले नसावे. अहमदाबादेत त्याचे छोटेसे दुकान आहे. आम्ही दोघं 'पत्रकार' आहोत हे कळल्यावर तो खाली उतरला. आणि निरनिराळ्या विषयावर बोलायला लागला. समाजवादामुळे हिंदुस्थानची विधूळवाट होईल असे त्याचे मत होते. संपत्ती निर्माण केल्याशिवाय देशात समाजवाद कसा आणता येईल, असा त्याने प्रश्न केला. मुरारजी देसाईंना प्रतिगामी म्हणून तुम्ही शिव्या देता; परंतु त्यानीच सुवर्णबंदी आणि कूळ कायदा केला नाही का ?...तुम्ही मराठी लोक मुंबईच्या गोळीबाराबद्दल मुरारजींना जबाबदार धरता; पण त्याच वेळी भारताचे पंतप्रधान नेहरू होते आणि त्यांना मुरारजींचं धोरण मान्य होते हे विसरता...नेहरू समाजवादी कसे ? आणि त्याच मंत्रिमंडळातील मुरारजी प्रतिगामी कसे ? असा त्याने सवाल टाकला. भारतातील सामान्य माणूस राजकारणावर किती खोल विचार करतो याचेच हे प्रतीक होते. तो व्यापारी असल्यामुळे त्याला कदाचित जास्त जाण असावी.

गाडी चाललीच होती. स्टेशनामागून स्टेशने जात होती. डोळे मिटून मी स्वस्थ पडलो होतो. फैजपूरच्या कॉंग्रेसला मी युवक म्हणून गेलो होतो. आता वय कळले होते आणि जमाखर्च मांडायच्या मी वृत्तीत होतो.

हिंदुस्थानातील जातीयवाद लवकरच संपेल असं त्या वेळी वाटत होतं. ते स्वप्नच ठरलं होत. हिंदु-मुसलमानांची तेढ स्वातंत्र्योत्तर काळातच फार वाढली होती. जातींचही तसंच ! ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद एका निराळ्या प्रकाराने संपला हे खरे. परंतु ब्राह्मणांची जागा सरंजामदार मराठ्यांनी घेतली हे खोटे नव्हे. समाजवादाचे तर काय झाले कुणास ठाऊक ! भारत हा एकसंध तरी आहे किंवा नाही याचीच शंका वाटायला लागली. जिकडे तिकडे भयानक आणि प्रचंड ज्वाळा दिसल्या. त्या आगीतून आमची गाडी शेवटच्या कॉंग्रेसकडे जात होती. मी डोळे मिटून पडलो होतो. निरनिराळ्या प्रश्नांची भुतं डोळ्यापुढे नाचत होती.

फैजपूर कॉंग्रेसच्या वेळेला सतावणारे सगळ प्रश्न लवकरच संपणार आहेत असा विश्वास होता. ते प्रश्न जास्तच विकट झाले होते.

मन भ्रमले होते. निरनिराळ्या समस्या भिववित होत्या. गाडी चाललीच होती. मी झोपलो नव्हतोच. पण पारगावकरांना वाटलं मला झोपच लागली आहे. त्यांनी मला हालवले व म्हटले "जोशीबुवा उठा. अहमदाबाद जवळ आले."

(क्रमशः)

लेखांक दोन – अलंकार ते गांधीनगर
लेखक – वि. शं. पारगावकर
पुढील अंकी

"नाना आज गमतीची बातमी वाचली वर्तमानपत्रात" चालता चालता टिपू म्हणाला.

"कोणती रे! दिनूनं विचारलं.

"ऐकतायनं नाना?"

विचारात गढल्याप्रमाणे दिसणाऱ्या नानांना टिपूने विचारले.

"हो रे! ऐकतोय! सांग!" नाना म्हणाले.

"कुठल्याशा गावातल्या एका सुशिक्षित जोडप्यानं डायव्होर्स घेतला आणि..."

"डायव्होर्स म्हणजे घटस्फोट म्हणायचय का तुला?"

बाळूने टिपूचे शुद्धीकरण केलं. मी हसलो. नाना, दिनू बाळू हसले. टिप्या थोडासा वैतागला. मी लगेच म्हणालो,

"डीव्होर्स ऊर्फ घटस्फोट ही विसाव्या शतकात काही विशेष बातमी होऊ शकत नाही."

"अरे ऐका तर खरं त्याचं. काय म्हणतोस टिपू!" नाना समजावणीच्या स्वरात म्हणाले.

हं, तर बातमी अशी होती की, त्या जोडप्यानं घटस्फोट घेतला आणि दोनच वर्षापूर्वी त्यांचा प्रेमविवाह झालेला होता.

भयंकरच! दिनू उद्‌गारला.

आश्चर्य आहे! बाळू तोंडात बोट घालीत म्हणाला.

"हा विनोद की शोकांतिका?" मी डोके खाजवीत म्हणालो. नाना मात्र गप्पच होते.

"नाना तुम्हाला काहीच वाटलं नाही?" बाळूनं विचारलं.

"होतं असं कधी कधी. बहुधा नेहमीच!" नाना म्हणाले.

"म्हणजे प्रेमविवाह नेहमीच अयशस्वी होतात असं का म्हणायचय नाना तुम्हाला–" मी म्हणालो.

"अं. हो! हो! तसंच. मला वाटत तसंच!" नाना उद्‌गारले.

"ही अतिशयोक्ती होतेय!" स्वतःच्या डाव्या हातावर उजव्या हाताची मठ

---

अनंत द. भालेराव

---

# वळणाचं पाणी

---



आपटीत बाळू म्हणाला. " अशी कितीतरी उदाहरणं मी पुढे करीन की, ज्यांचा प्रेमविवाह सुखाचा झाला आहे. आमच्या शेजारी रहाणारे जोशी, समोरच्या बंगल्यातले वैद्य— "

" होतात. काही प्रेमविवाह सुखाचेही होतात ! पण अशी उदाहरणे फारच थोडी असतात. " नाना हसत म्हणाले.

" मला हे मान्य नाही ! " बाळू आपला मुद्दा पुढं ढकलीत म्हणाला.

" अरे, फार कमी पाहिलय आणि फार कमी अनुभवलय तुम्ही मुलांनी. माझ्या

समोर अशी कितीतरी उदाहरणं तरळताहेत की ज्यांचे प्रेमविवाह झाले आणि आज-मितीला ओढायचाच संसार म्हणून ओढताहेत. विभक्त होण्याची लाज वाटते, भीती वाटते म्हणून एकत्र रहाताहेत.–राघव साठेचं सुद्धा असंच झालं. आज तो वेड्याच्या इस्पितळात आहे !" नाना थांबले.

" राघव साठे ? कोण राघव साठे ? " आम्ही चौघांनी एकदम विचारलं.

" सांगतो. सांगतो ! आपलं बसण्याचं ठिकाणही जवळच आलं आहे !"

" बसा ! बसा !"

जमिनीवर टाकलेल्या आपल्या हातरुमालावर बसत ते म्हणाले. आम्ही त्यांच्या भोवती कोंडाळं करून बसलो.

" राघव साठे !" नानांनी सुरुवात केली. आम्ही कान टवकारले.

" राघव साठे माझा चांगला मित्र होता. एकाच गावात रहात होतो. एकाच महाविद्यालयात शिकत होतो. दिसायला तो अतिशय सुंदर होता. उंचापुरा देखणा होता. त्याची नी माझी कायमची जोडी असायची महाविद्यालयात.

राघवचं घराणं कर्मठ ब्राह्मणाचं होतं. गावात त्याचं फार वजन होतं. त्यांच्या शब्दाला किंमत होती. राघवचे वडील–त्यांना सगळे आप्पासाहेब म्हणत–एक प्रसिद्ध वकील होते. विलायतेला जाऊन आलेले होते. तरी सुद्धा स्वतःच्या संस्कृतीचा, धर्माचा त्यांना फार अभिमान होता. राघवची आई एक साध्वी स्त्री होती. फारशी शिकलेली नव्हती. त्याकाळी स्त्रिया फारशा शिकतच नसत, आणि तरी सुद्धा आपल्या मुलांना जगावं कसं हे शिकवीत असत. राघवची आई तशीच होती. तिच्याकडे पाहिल्यावर समईच्या शांत प्रकाशाची आठवण होई. पत्नी शब्दातील पावित्र्य, मांगल्य तिच्या ठायी पूर्णपणे भरलेलं होतं. देवधर्म, सोवळं–ओवळं, व्रत-वैकल्यं त्यांच्या घरी पूर्णपणे पाळली जात. आप्पासाहेबही देवभक्त होते. ज्या आवडीने ते मांसाहार करीत, मद्यपान करीत, त्याच भक्तीने प्रसाद खात. त्याच भक्तीने तीर्थ प्राशन करीत असत. राघवचं घर म्हणजे फार जुना, फार प्रशस्त असा वाडा होता. त्यांच्या घराण्यातल्या कुणा एका पुरुषाला पेशव्यांनी तो भेट दिला होता. राघवचं घराणं तसं इतिहासप्रसिद्ध. त्यांच्या पूर्वजांनी इतिहासात अनेक पराक्रम गाजवले होते. ह्याचा आप्पासाहेबांना फार अभिमान होता.

अशा खानदानी घराण्यात राघव जन्मला होता. तेच खानदानी रक्त त्याच्या अंगात होतं. त्याच रक्तातले गुणदोष त्याच्या अंगात होते. राघव त्यावेळी महाविद्यालयाचं भूषण होता. अनेक खेळात तो प्रवीण व बुद्धीनही तल्लख होता. असे प्रभावी व्यक्तिमत्त्व फार कमी जणांना मिळतं. राघवला ते मिळालं होतं. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राघवला गाण्याचं कमालीचं व्यसन होतं. त्याचा स्वतःचा आवाजही छान होता. दिवसभर तो काहीना काही गुणगुणत असे. राघवमुळेच खरं तर गाणं कसं ऐकावं हे मी शिकलो. गावात घडणाऱ्या प्रत्येक गाण्याच्या

बैठकीला मी आणि राघव हजर असायचो. गाणं ऐकताना तो अगदी तन्मयं होऊन जाई. रात्री ऐकलेल्या गाण्याची धुंदी बकुळीच्या सुकलेल्या फुलांच्या सुगंधासारखी दिवसासुद्धा त्याच्या मनावर असे.

राघवनं डॉक्टर किंवा इंजीनीयर व्हावे अशी आप्पासाहेबांची फार इच्छा होती; पण कलाविभागात प्रवेश घेऊन राघवनं तिला सुरुंगच लावला होता. किमान त्यानं बॅरिस्टर व्हावं आणि आपलाच व्यवसाय पुढे चालवावा असं त्यांना वाटत होतं. राघवला बॅरिस्टर होणं अशक्य होतं असं नाही. त्याची बुद्धी तीक्ष्ण होती. बॅरिस्टर होऊन यशस्वी वकील तो निश्चित झाला असता. पण दैवानं त्याला मास्तर केलं. साधा शाळामास्तर."

"राघव साठे शाळा मास्तर झाला ?" बाळू जणू किंचाळलाच.

"हो ! हो ! तो मास्तर झाला." नाना म्हणाले.

"राघवचं मन फार नाजुक होतं. भावनेचा स्पर्श लगेच होणारं होतं ! शुभ्र चांदणं, गाणं हे त्याचे आवडते विषय होते. कितीतरी चांदण्या रात्रीत आम्ही एकत्र भटकलो असू. त्यावेळी राघव गाई. अगदी मुक्त कंठानं.

आमच्या गावात उत्तम गायकांच्या मैफली नेहमीच घडत असं नाही. पण आमच्या गावाला प्रसिद्धी होती ती दुसऱ्याच गोष्टीमुळे. आमचं गाव कलावंतीणीसाठी प्रसिद्ध होते. गावात त्यांचा वेगळा विभागच होता. गावातले अनेक छंदीफंदी लोक तिथं जात. जाताना तोंड उपरण्यात लपवीत आणि येताना चेहरा शक्य तेवढा सभ्य ठेवीत. त्याकाळी पापाला आजच्या सारखं मोकळं फिरता येत नसे. पापालासुद्धा पुण्याचं पांघरूण पांघरावं लागे.

बी. ए. च्या शेवटच्या वर्षाला असताना राघव तिथलं गाणं ऐकण्यासाठी जाऊ लागला. एकदोनदा मीही त्याच्या बरोबर गेलो होतो. पण आमच्या तीर्थरूपांनी



आमचे कान लंबे केले. त्याकाळी मुलांना त्यांचे वडील मारीत असत बर का बाळू !"

" मग राघवलासुद्धा मार खावा लागला असेल."

टिपूने शंका काढली.

" नाही ! राघवचा गाण्याचा छंद आप्पासाहेबांना ठावूक होता. झालंच तर खुद्द त्यांच्या वाड्यातसुद्धा प्रसंगविशेषी नाच–गाण्याचे कार्यक्रम होत. त्यामुळं राघवच्या 'तिकडे' जाण्याला अ प्पासाहेबांचा विरोध नसावा."

" राघव 'तिकडे' नेहमी जात असे का ?" मी विचारले.

" नाही ! नेहमीच नाही, पण आठवड्यातून तीन एक वेळा तरी जात असे."

पण एक दिवस राघवनं मला धक्कादायक बातमी दिली. तिथल्या एका नाचणाऱ्या मुलीवर त्याचे मन गेलं होतं. हे ऐकून मी बधीरच झालो. महाविद्यालयात राघवच्या पुढे पुढे करणाऱ्या अनेक मुली होत्या. पण राघव एकीलाही बधला नव्हता. अशा राघवचे एका नाचणाऱ्या मुलीवर प्रेम बसावे ? अशक्या कोटीतली गोष्ट घडली होती.

" ती मुलगी दिसायला कशी होती ?"–दिनू.

" तीचं नाव ?"–टिपू.

" सांगतो ! सांगतो !" दिनूचा खांदा थोपटीत नाना बोलू लागले.

" त्या मुलीचं नाव होतं सुनदा. दिसायला ती अतिशय सुंदर होती अशातला भाग नाही. रंगानं ती सावळीच होती. नाकीडोळी तरतरीत होती. केस खूप लांब होते. आणि मुख्य म्हणजे तिचा बांधा फार सुरेख होता.

राघवच्या नी सुनंदाच्या भेटीगाठी वाढू लागल्या. उपहार गृहात, उद्यानात, नाटकगृहात ते एकत्र दिसू लागले. राघवला ह्या सर्वापासून परावृत्त करण्याचा मी प्रयत्न केला. पण तो तिला लग्नाचेही वचन देऊन बसला होता.

एक दिवस दुपारीच आप्पासाहेबांचा मला निरोप आला. आप्पासाहेबांशी बोलण्याची वेळ फारशी कधी आलीच नव्हती. त्यामुळे निरोप पाठवून मला बोलावणं धाडल्याचे आश्चर्य वाटलं. मी गेलो.

आप्पासाहेब एका प्रशस्त खोलीत आराम खुर्चीत बसले होते. त्यांची मुद्रा ओढल्यासारखी दिसत होती. डोळे लाल झाले होते. त्यामळे त्यांचा चेहरा उग्र दिसत होता. मला पहाताच हातांनीच त्यांनी त्यांच्या जवळ बसण्याची खूण केली. मी दबकत दबकत त्यांच्या जवळ बसलो. एक सुस्कारा टाकून ते म्हणाले–

" आमचा वाडा तुम्ही पहाता आहात !"

" हो "

" खूप जुना आहे ! सरासरी तीनशे वर्षांपूर्वीचा !"

" हो ! हो !"

" काय वाटतं तुम्हाला ह्या वाड्याविषयी ?"

"तसं खूप खूप वाटतं. ह्या वाड्यानं इतिहासात घडलेली अनेक स्थित्यंतरं पाहिली असतील. आमचा शौर्यशाली इतिहास पाहिला असेल."

"वाटतं ना, वाटतं ना असंच !" आप्पासाहेब माझं बोलणं मधेच थांबवीत म्हणाले. "आता इकडे या."

मी त्यांच्या मागोमाग एका दुसऱ्या दालनात गेलो. भिंतीवर अनेक तसबिरी ओळीने लावल्या होत्या. "पहा, ह्या तसबीरी पहा." आप्पासाहेब म्हणाले. मी एकेक तसबीर पाहिली. सरदार, दरकदारांच्या त्या तसबिरी होत्या. तसबिरी पाहून झाल्यावर आम्ही परत पहिल्या जागी येऊन बसलो.

"पाहिल्यात तसबिरी ? आमच्या पूर्वजांच्या आहेत." आप्पासाहेब म्हणाले. "काय वाटलं तुम्हाला–?" त्यांनी मला विचारलं.

"हेच की, तुमच्या घराण्यात शौर्याची परंपरा आहे, तुमच्या पूर्वजांनी इतिहास घडवला. पावन केलंय तुमचं खानदान."

"वाटतं ना, वाटतं ना असं ?" परत माझे बोलणे थांबवीत ते म्हणाले.

"आता ह्या खानदानी रक्तात राघव जर माती मिसळत असेल तर मी सहन करावं का ? अहो चांगली जनावरं पाहिजे असतील तर उत्तम जातीचीच जनावरं आपण एकत्र आणतो. ही तर माणसांची गोष्ट. राघव एका नाचणाऱ्या मुलीशी लग्न करतोय. पटतं का हे तुम्हाला ? ना त्या मुलीच्या आईचा पत्ता ना बापाचा ठावाठिकाणा. काय दोष असतील त्या रक्तात ते आम्ही आमच्या रक्तात मिसळायचे का ? आम्ही सुद्धा छंदफंद केले. पण सोनं म्हणून पितळ घेतलं नाही. अहो. भांग सुद्धा खातात, पण पूजा मात्र तुळशीचीच करतात. देवाचं तीर्थ आणि मदिरा ही एक असू शकतील का ? नाही ना ? नाही ना ? मग माझं एक काम करा. राघवला त्याच्या बेतापासून परावृत्त करा. त्याच्या आईनं तर आतापासूनच अंथरूण धरलय." माझ्या खांद्यावरचा आप्पासाहेबांचा हात थरथरत होता. त्यांचे डोळे भरून आले होते.

"मी प्रयत्न करीन !" मी म्हणालो.

"पण दुदवाने आप्पासाहेबांचं आश्वासन मी पूर्ण करू शकलो नाही. राघवनं सुनंदाशी विवाह केलाच. खानदानी ब्रह्मकुलोत्पन्न राघव साठेनं एक नाचणाऱ्या मुलीशी विवाह केला."


"ब्रेव्हो ! ब्रेव्हो !" दिनू टाळ्या पिटीत म्हणाला.

"शाब्बास राघव !" बाळूनं पुस्ती जोडली.

"ह्या विवाहानं गावात बरीच खळबळ माजली. काही पुढाऱ्यांनी राघवचा सत्कार केला. हारतुरे घातले. तर काही सनातन्यांनी बोटं मोडली.

राघवला बी. ए. ला पहिला वर्ग मिळाला नाहीच; पण तो अगदी जेमतेम पास

# असावे घरटे अपुले छान !




स्वत:चे घर असावे ही सुखद कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्याची नामी संधी आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या 'स्वत:चे घर बांधा' या योजनेमुळे चालून आली आहे. जरूर तेवढे कर्ज माफक दरात व दीर्घ मुदतीने मिळण्याची सोय आहे. मात्र घर बांधणार ती जागा स्वत:च्या मालकीची हवी. ही योजना भारतातील १५६ शहरांत व महाराष्ट्रातील १७ प्रमुख शहरांत [illegible] आहे.

अधिक माहितीसाठी आमच्या कॉर्पोरेशनच्या जवळच्या विभागीय कचेरीशी संपर्क साधा.

आयुर्विम्याला पर्याय नाही.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**



PRATIBHA 693

झाला. गावातच त्यानं वेगळे बिऱ्हाड थाटलं. गावातल्याच शाळेत तो मास्तरकी करू लागला. राघवचा संसार सुरू झाला.

सुनंदा एक नर्तिका होती. एक गायिका होती. तिनं शास्त्रोक्त नर्तन शिकावं म्हणून राघवने तिच्याकरता एका नाच मास्तराची नेमणूक केली आणि त्या मास्तरने तिला संसाराचा ताल बिघडवण्याचे धडे दिले. आप्पासाहेबांचं म्हणणं खरं ठरलं. सुनंदाची आंतरिक इच्छा जरी संसार करावा अशी असली तरी तिचा पिंड तसा नव्हता. एकाच पुरुषाबरोबर एकनिष्ठ रहाणे तिला जमलं नाही. नाही तर नाचमास्तराबरोबर उपहारगृहात, उद्यानात ती दिसली नसती. खरी कला किंवा खरे गुण ह्यापेक्षा तिला भोगलालसा, ऐश्वर्य यांची जास्त आवड होती. नाचमास्तराशी तिचे वागणे हे गुरु – शिष्य ह्या पवित्र्य नात्यापेक्षा वेगळे होते. राघवला हे मी परोपरीने समजावले – पण सुनंदेवरील गाढ प्रेमामुळे त्याने दुर्लक्ष केले.

राघवचा संसार सुरू होऊन महिना उलटतो तोच राघवची आई वारली. पत्नीच्या वियोगामुळे आप्पासाहेबही आजारी झाले. आईच्या वियोगाचा राघवच्या मनावर फार परिणाम झाला. आणि जवळजवळ पंधरा दिवसांनीच ती भयंकर घटना घडली. राघवची प्रिय पत्नी सुनंदा, जिच्याकरता त्यानं घरदार, आईवडील, पैसा सोडला, ती सुनंदा राघवला सोडून नाचमास्तराबरोबर पळून गेली. हा धक्का राघवच्या नाजूक मनाला मानवण्यासारखा नव्हता. राघव ठार वेडा झाला. रस्त्यातून गळे काढीत भटकू लागला."

नानांनी आपले डोळे कोरडे केले.

"आणि सुनंदा ? तिचं काय झालं ?" बाळूनं विचारलं

तिचं ? नाना विषण्णपणे हसले.

"आजची सुप्रसिद्ध चित्रपटनायिका जयवंतीबाला हीच सुनंदा साठे."

"भयंकर !" बाळू उद्गारला.

"असं व्हायला नको होतं. खरच नको होतं." दिनू म्हणाला.

नाना गप्पच होते. ते उठले. चालू लागले आम्हीही त्यांच्या मागून चालू लागलो.



# एक
# आकाश
# बाकी
# बचि



## आनन्द चांदेकर

### लेखांक सात

**१ जून १९६६**

"We should reach by two" अरोरा बोलला. अजून आम्हाला ८००–९०० फूट चढायचे होते. चढ कठीण आहे. माझा वेग चांगलाच मंदावला आहे, पण मी थकून गेलो नाही. "Come on sir, we have only a little to go ahead" अरोरा चढताना, मागून मला म्हणाला. मला ते आवडत नाही. त्याला वाटते मी जवळजवळ संपलो आहे. पण ते खरे नाही. मला फक्त थोडी पावले टाकल्यावर दम घेण्यासाठी थांबावे लागते. प्रत्येकाची गती त्याच्या लयीनुसार असते. मी शिखर गाठणार याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. Let me catch my breath Arora" मी त्याला म्हणतो. पण अरोरा मात्र बराच थकलेला व उत्तेजित (excited) दिसतो.

शिखर आता अगदी जवळ दिसते. जरा ढग बाजूला झाले की ती घळ पण स्पष्टपणे दिसते. हवा मात्र आणखीच खराब झाली आहे. वारा जोरदार आहे. बर्फ अधिकच पडू लागले आहे. ह्या पर्वताला आम्ही त्याच्या एकांताचा भंग केलेला आवडला नाही असे दिसते. ढग काळेकुट्ट आहेत. दुणागिरी व छोटा हनुमानदेखील दिसत नाहीत. काही वेळेला ढग जरा बाजूला होऊन पुढली वाट दिसेपर्यंत आम्हाला थांबावे लागते.

आम्ही त्या घळीजवळ पोहोचतो. ती ओलांडण्याला वरून रस्ता नाही. पण जरा खालच्या पातळीला तिच्यावर बर्फाचा पूल झालेला दिसतो. तेथे पोहोचायला आम्हाला आमच्या उजव्या कडेची cornice फोडून या रीजच्या बाहेरच्या बाजूला उतरावे लागेल. नंतर ती प्रचंड भेग बर्फाच्या पुलावरून ओलांडता येईल.

आम्ही कॉर्निसजवळ आलो. छोपसांग बाहेरच्या बाजूला उतरायच्या तयारीत आहे. त्याला संभाळण्यासाठी मी माझी कुऱ्हाड बर्फात पूर्णपणे गाडतो व त्यावर पाय ठेवतो. तो कॉर्निस फोडून पलीकडे उतरतो. आता पलीकडच्या बाजूला तो उभा आहे. तिथे भलताच उतार आहे. बर्फ ताजे व भुसभुशीत आहे. त्याचे पाय गुडघ्याच्या वरपर्यंत बर्फात घुसले आहेत. त्याच्या पायाखालचे बर्फ घसरते. त्याचे पाय पण स्थिर वाटत नाहीत. त्यामुळे एखादा हिमप्रपात (avalanch) येथे सुरू होतो की काय ? मला भीती वाटते. पण तो पाय आपटून वाट तयार करतो, व थोडा पुढे जाऊन माझ्यासाठी थांबतो. आपली कुऱ्हाड बर्फात खोलवर घुसवून तो मला संभाळण्याच्या तयारीत उभा आहे. मी ओलांडून पलीकडे जातो एवढ्यात ढग जरा विरळ होतात. माझ्या पायाखाली मला दुणागिरीपासून हनुमानकडे जाणाऱ्या भिंतीचा माथा दिसतो. ३००–४०० फूट खाली. मी लोपसांग जवळ जाऊन पोहोचतो. " Saab we have to be careful here " तो म्हणाला, " बिले बहोत अच्छा रखना " आणि तो पुढे निघतो. खरोखरच ह्या ठिकाणी भयंकर धोका आहे. केलेली चूक महागात पडेल.

बर्फ फारच जोरात पडू लागले. पण हळू हळू तो पुढे सरकतो. तो आता त्या पुलाजवळ पोहोचला. इकडे अरोरा व दोरजे आमच्या बाजूला आलेले आहेत. सर्वांचे चेहरे गंभीर आहेत. जरुरीपेक्षा एक शब्द जास्त येत नाही. लोपसांग मला पुढे येण्यास खुणावतो. मी निघतो. पण आता बर्फाचा मारा मघापेक्षाही वाढला आहे. त्याचे गोळे होऊ लागले आहेत. मी माझा पाय वर उचलला तो खाली ९ इंच जाडीच्या चिखलाप्रमाणे चिकटलेला बर्फाचा थर. कॅम्पॉन दिसत पण नाही. मला चालणे कठीण झाले आहे. माझ्या पायाखाली भुसभुशीत बर्फ आहे. बुटाच्या तळाला दोन चेंडू चिकटल्यासारख्या माझ्या हालचाली होतात. मी धडपडतो. वारा वादळी आहे. त्याने तोंडावर बर्फाचा मारा होतो. बदाबद आकाशातून बर्फ पडते आहे. " साब स्नो बहोत आ रहा है "

आता काय होणार. मी जर इथे जास्त धडपड केली तर नक्की हिमप्रपात सुरू होईल असं मला वाटते. पण धीर सोडून चालणार नाही. एकदम मला येथे आता काय केले पाहिजे हे ध्यानात येते. मी एक पाय उचलून धरतो व कुऱ्हाडीने बुटाच्या बाजूवर फटके मारतो. बुटाखाली चिकटलेले बर्फ चटकन खाली पडते. नंतर दुसऱ्या बुटावर तोच प्रयोग. मग मी पुढे सरकतो व लोपसांग जवळ पोहोचतो. अरोरा माझ्या पाठोपाठ येतो व नंतर दोरजे. आम्ही चौघे त्या पुलाजवळ उभे आहोत.

"Now sir, we must be very very careful" पूल ओलांडण्याच्या तयारीत लोपसांग म्हणतो. तो पुढे वाकून कुऱ्हाडीच्या टोकाने पुलाच्या बर्फाचा अंदाज घेतो. व मग पुढे पाऊल टाकतो. पूल मोडत नाही. तो कठीण बर्फाचा आहे. प्रत्येक वेळेला पुढल्या पावलाच्या जागेचा कुऱ्हाडीने अंदाज घेत लोपसांग पुढे सरकतो. मी दोर माझ्या कुऱ्हाडीला बांधून कुऱ्हाड बर्फात घट्ट रोवून ठेवली आहे. आम्ही श्वास रोखून लोपसांगची प्रगती पहात आहोत. शेवटी तो पलीकडे पोहोचला. मागे वळून आनंदाने हसला. मला पुढे येण्यास तो खूण करतो. मी त्याच्या पावलावर पाउल ठेवून पूल ओलांडतो.

हवा अजून खराबच आहे. पर्वतांवरून ढग सुसाट पळतात. माझ्या डाव्या बाजची प्रचंड भेग फारच संदर दिसते. या ठिकाणी पर्वताचे सरळ दोन भाग झाल्यासारखे वाटतात. समोरच्या भोकातून पलीकडील आकाश पण दिसते. निळसर बर्फाने पर्वताचे ते दोन भाग, आम्ही आलो ती रीज व शेवटली रीज—जोडले आहेत. माझ्या डाव्या बाजूला खालच्या भेगेचा तळ दिसत नाही. उजव्या बाजूला ती थोडी फार बर्फाने झाकली गेली आहे. तेथून खाली सरळ भिंतीसारखा उतार आहे. मी लोपसांगजवळ पोहोचतो. नंतर अरोरा व दोरजे येतात.

आम्हाला समोरचा भुसभुशीत बर्फाचा चढ चढून वरची कोर्निस फोडून शेवटच्या रीजवर पोहोचायचे आहे. आम्ही ढगात चढतो. आमच्या उजव्या बाजूचा उतार इतका सरळ आहे की तो कोठे पोहोचतो ते आम्हाला दिसत पण नाही. मी लोपसांगच्या पाठोपाठ वर जातो. अरोरा थकून गेलेला दिसतो. त्याची पावले नीट पडत नाहीत. मी मात्र फार खुशीत आहे. उंचीचा माझ्यावर काहीच परिणाम नाही. डोकेदुःखी नाही की काही नाही. फक्त दम लवकर लागतो. पण ते या उचीवर होणारच.

शेवटली कोर्निस फोडून लोपसांग वर पोहोचला. त्याच्या पाठोपाठ आम्ही. आता आम्ही चौघे शिखरावर पोहोचणाऱ्या शेवटच्या उतारावर आहोत. पण शिखर दिसत नाही. ढग फार दाट आहेत. आम्ही थांबतो. एकदम पडदा उघडावा तसे ढग बाजला होतात. आम्हाला शिखर दिसते. जवळच जेमतेम ३० यार्डावर आम्ही तिकडे जाऊ लागतो. आम्ही शिखराच्या जवळ पोहोचतो. लोपसांग थांबतो. "साब आप आगे चलिये" तो मला सांगतो. मी शिखरावर प्रथम पोहोचावे

म्हणून. "उसमे क्या है साब, दोन्होही साथमे जायेंगे" मी म्हटले आणि मग आम्ही पोहोचलो. हनुमानच्या शिखरावर. १९९३० फूट. आणि खाली बसलो. सव्वादोन झालेत. आम्ही ढगातच बसलो आहोत. आसपासचे पर्वत दिसत नाहीत. वादळी वारा सुटला आहे. बर्फाचे पुंजकेच्या पुंजके पडतात. आम्हाला धड उभे सुद्धा रहाता येत नाही. जेमतेम १५ यार्डापर्यंतचे दिसत आहे. एकूण आम्ही वादळात सापडलो आहोत. पण माझ्या मनात फार समाधान आहे. I am very happy. आम्ही १९९३० फुटावर हिमालयातल्या एका शिखरावर, पूर्वी कोणीही न चढलेल्या शिखरावर बसलो आहोत. हा एक अत्युच्च क्षण आहे. शब्दात पकडता येत नाही. मनाच्या अवस्थेचे वर्णन करता येत नाही. स्वप्नपूर्तीच्या आनंदाचे वर्णन कसे करावे.? अरोराची फोटा काढण्याची धडपड चालू आहे. "Arora saab be careful" लोपसांग म्हणाला. शिखरावर जागा फारच थोडी आहे. तीन बाजूंनी उतार आहे, व टोकावर आम्हाला जेमतेम बसता येईल एवढीच जागा. वारा एवढा जोरात आहे व बर्फ इतक्या प्रमाणात पडत आहे की अरोराला फोटो काढता येत नाही. तो आमच्याजवळ येऊन बसतो.

आज शिखरावर जायचा उद्देश नसल्याने आमच्या बरोबर ध्वज किंवा हनुमानाची मूर्ती नव्हती. ध्वज फडकविण्याची व ती मूर्ती स्थापन करण्याची कामगिरी आता दुसऱ्या तुकडीला करावी लागेल. आम्ही फक्त रसांचे (पेरूच्या) डबे आणले आहेत. ते रिकामे करून बर्फात गाडून ठेवतो. आम्ही पोहोचल्याची खूण. दुसऱ्या तुकडीला ते मिळतील.

वादळाचा जोर वाढतच आहे. ह्या पर्वताला आमचे येथले अस्तित्व सहन होत नसावेसे दिसते. "Let us get out of this place Sir. It is very dangerous here" लोपसांग म्हणाला. आम्ही जेमतेम १०–१५ मिनिटे शिखरावर थांबलो असू. पण आम्हाला परत फिरायला हवे.

आम्ही उभे रहातो. अरोरा एक फोटो काढतो. नंतर आम्ही उतरायला सुरुवात करतो. आता उलट्या क्रमाने प्रथम दोरजे, नंतर अरोरा, मग मी व सर्वात शेवटी लोपसांग. अरोरा बर्फात धडपडतो. तो अगदी थकून गेला आहे. बर्फात जवळजवळ आडवा झाला. "Arora saab, Arora saab" लोपसांग ओरडतो. अरोरा पुन्हा उभा रहातो. त्याची धडपड धोकादायक होती. आम्ही कोर्निसजवळ येतो. येथूनच आम्ही शिखराजवळच्या शेवटच्या उतारावर आलो. दोरजे प्रथम जातो. मग अरोरा. पण अरोरा अगदीच थकला आहे. मी नंतर येतो. एवढ्यात अरोरा पुन्हा बर्फात पडतो व बसतो. ह्या ठिकाणी एवढी धडपड करणे बरे नाही. लोपसांग चिडतो.

"अरोरासाब आपको मरना है क्या? You want to die? "Saab I am getting up" असे काहीतरी अरोरा म्हणतो व धडपडत उठतो. त्याला काल रात्री

झोप लागली नाही व सकाळी त्याने फारसे खाल्ले पण नाही. अगदी थकून गेला. आहे.


अरोरा पुन्हा घसरला व बसला. लोपसांग पुन्हा ओरडतो. " Arora, party is full in the snow when walking. " ये क्या कर रहे है आप ?" " Take it easy Arora. Don't be in a hurry " मी त्याला म्हणतो. तो गळून गेला आहे. व त्यात उतरण्याच्या तंत्राचे त्याला विस्मरण झाले.

आम्ही आता त्या घळीजवळ आलो आता शिखर गाठल्याच्या आनंदात ती फारच सुंदर दिसते. पण मला फोटो काढता येत नाही. आता फक्त काळजीपूर्वक खाली उतरायचे आहे ढग थोडे विरळ होतात व त्यातून एक अद्भुत दृश्य दिसते. ऋषिकोटच्या भिंतीवरून पलीकडे आम्ही Nandadevi Sanctuary मध्ये डोकावून पाहू शकतो. नंदादेवी पायथ्यापासून शिखरापर्यंत दिसतो. त्याची भव्यता जाणवते. ती जुळी शिखरे, चांगभांग, रामानी हिमनदी व आसपासची अनेक शिखरे दिसतात. पण हे काही क्षणच. पुन्हा ढगाचा पडदा पडतो आणि आणखी बर्फ पडू लागतो.

आम्ही बांधून ठेवलेल्या दोरांजवळ आलो. ते दोर धरून सरळ खाली उतरायचे. माझ्या एका पायाचा क्रँपोन दुसऱ्या पायाला अडखळतो मी जरा घडपडतो पण कुऱ्हाडीच्या सहाय्याने उभा राहातो. " Be careful Saab " मागे असलेला लोपसांग म्हणतो. अरोरा पुन्हा घडपडतो. तो तंत्रच विसरला आहे. " क्या आपके ट्रेनिंका फायदा अरोरासाब ? " लोपसांग त्याला म्हणतो. आम्ही भराभर खाली उतरतो. आता पुन्हा कॉर्निस ओलांडून खाली उतरायचे. उतरताना माझ्या क्रँपोनच्या खिळ्याने पँट जरा फाटते, पण जास्त काही होत नाही. आता धोका फारसा नाही. आम्ही खाली उतरलो. ह्या पुढे सरळ चालत जायचे. आमच्या पायाने जाताना झालेली वाट दिसत आहे. धोका संपला. बर्फ पडतच आहे, पण त्याचे आता आम्हाला काही वाटेनासे झाले आहे. आम्ही विश्रांतीसाठी बसतो.

दोरजेने त्याच्या रकसॅकमधून कॉफीने भरलेला एक थर्मास काढला. कॉफी गरम नव्हती पण जरा कोमट. आम्ही उठतो तो लांब अंतरावरून आमच्याकडे येणाऱ्या दोन आकृती दिसतात. माळी व देसाई. ते जवळ येताच मी त्याना बोटाने V खूण करतो. ते धावतच येतात. " Mali we have done it " मी ओरडतो. " Wonderful wonderful " त्यांना एवढेच शब्द सुचतात. माझा हात धरून ते अभिनंदन करतात. त्यांनी आणलेल्या गरम गरम कॉफीचे घोट घेत आम्ही गप्पा मारीत उभे रहातो.

आम्हाला लवकरच कॅम्पवर गेले पाहिजे बर्फ जास्त पडू लागले आहे. माळी व देसाई अरोराला ताब्यात घेतात. दोन्ही बाजूने त्याला घेऊन ते कॅम्पकडे निघतात. मी, लोपसांग व दोरजे पुढे जातो. मला थकवा मुळीच वाटत नाही. बहुधा यशाच्या आनंदाच्या भरात.



आनंदाचा तो क्षण....

"दिनांक ३ जूनला, लोपसांग, व्यंकी, घरत व प्रकाश श्रृंगारपुरे ही तुकडी शिखरावर पोहोचली. त्या दिवशी हवा उत्तम होती. त्यांनी शिखरावर आम्ही नेलेल्या हनुमानाच्या मूर्तीची स्थापना केली व गिरीविहारचा ध्वज, राष्ट्रध्वज, त्याचप्रमाणे मुंबई विश्वविद्यालय व राष्ट्रसेवादलाचे ध्वज शिखरावर फडकविले. आमच्या ओंवळेकरांना मात्र शिखरापासून ८० फुटापासून परत फिरावे लागले, कारण ते व दोरजे तेथे पोहोचेपर्यंत हवा बिघडू लागली होती."

कॅम्प जसा जवळ येतो तसे लोपसांग व दोरजे वेगळी वाट काढतात. मी सरळ मार्गाने जातो; कॅम्पमध्ये सर्व माझी वाट पहात आहेत. सर्वजण अगदी मिठ्या मारून अभिनंदन करतात. मला ते तंबूत नेतात. नंतर लोपसांग व दोरजे कॅम्पमध्ये येतात. त्यांनी मुद्दामच मला अगोदर कॅम्पमध्ये पोहोचू दिले. माझे अभिनंदन प्रथम व्हावे म्हणून. डॉ. जेव्हा नंतर बोलले तेव्हा ही गोष्ट माझ्या ध्यानात आली. किती दिलदार माणसे! मला शिखरावर पोहोचतानाचा प्रसंग पण आठवला. मी सर्वांना बाहेर जाऊन त्यांचे स्वागत करण्यास सांगतो. सर्व बाहेर जातात. आनंदाच्या आरोळ्या व अभिनंदनाचे शब्द मला तंबूत ऐकू येतात. लोपसांग येतो. तंबूचे दार वर करून तो कडेला बसतो व माझ्याकडे पाहून हसतो. Wonderful saab. It is all due to you " मी त्याला म्हणतो. थोड्यावेळाने तो त्याच्या तंबूत जातो.

आता सर्व माझ्या भोवती बसले. कोणीतरी माझ बूट व पायमोजे काढले. ते बर्फाने भरून गेले होते. एकाने माझ्या हातात गरम गरम सूपचा पेला दिला. डॉक्टरांनी ब्रँडीचा एक कडक डोस.

अरोरा आत येतो व माझ्या शेजारी पडतो. आम्हाला इतर सदस्य वीरासारखे व त्याचबरोबर लहान मुलांसारखे वागवतात. आमची काळजी घेतात. माझ्या पायात आता गोळे येऊ लागले. घरत त्यांना ब्रँडी चोळतो. मी एका मागोमाग सिगरेट ओढतो. सर्वांना आमच्या चढाईचे वर्णन हवे आहे.

आणि मी...मी मात्र आज खूप खूप आनंदात आहे. माझे फार वर्षापासूनचे एक स्वप्न साकारले आहे.

# स मा प्त

१० जानेवारी १९७०

राजकारणाचा व स्त्रियांचा संबंध फार जवळचा आहे. सुंदर चेहऱ्याने प्रत्येक देशात रामायण–महाभारत घडवून आणलेले आहे. हे सुंदर चेहरे पुरुषी राजकारणात का नाक खुपसतात त्याचे गूढ मला अजून उमगलेले नाही. राजकारण हा स्त्रियांचा प्रांत नाही अशी माझी ठाम समजूत आहे. चंचल मन, कोणाना कोणा पुरुषाचा प्रभाव, निर्णय घेण्याची कुवत नसणे आणि असूया व सूड यांनी पेटलेले कोते मन या पाच दुर्गुणांनी स्त्री राजकारणात यशस्वी ठरू शकत नाही असा माझा अनुभव आहे. एवढे असले तरी धकाधकीच्या व बटबटीत पुरुषांच्या राजकीय वैराण वाळवंटात सुंदर स्त्रिया मोठ्या आल्हाद-दायक व सुखकारक हिरवळी (Oasis) तयार करतात हे मी मानतो. तारकेश्वरी सिंहा, शारदा मुखर्जी, विजयालक्ष्मी पंडित किंवा इंदिरा गांधी यांच्याशी संभाषण केलेला पुरुष माझ्या मताशी सहज सहमत होईल.

इंदिरा गांधींच्यात तर हे 'अपील' विलक्षण आहे. स्त्रिया सुंदर असतात पण त्या साऱ्यांमध्येच हे आकर्षण असेल असे मात्र नाही. इंदिरा गांधी उत्कृष्ट सभाषणपटु, सहानुभूती दाखविणाऱ्या श्रोत्या, हुशार हजरजबाबीपणा अंगी असलेल्या, आदरातिथ्यात हार न

## बापसे बेटी सवाई – पण कशी?



जाणाऱ्या व खानदानी देखणेपणा अंगी असलेल्या नेहरूंच्या सुकन्या आहेत. नेहरू पुरुष होते. पण त्यांच्या अंगी असलेच अजब वैयक्तिक लोहचुंबकत्व होते. वर्ल्ड बँकेचे अध्यक्ष यूजीन ब्लॅक यांनीदेखील एकदा कबूल केले होते की, मी नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाने मोहून गेलो होतो. नेहरूंनी कोणाच्या खांद्यावर एकदा का हात ठेवला की बस्स्, वो मरही गया ! नेहरूंच्या सुकन्येजवळ पिताजींचे हे चुंबकत्व वारसाईने आल्यास नवल नाही.

लोकसभेतील प्रेक्षकांच्या गॅलरीत बसून खासदारांची व प्रेक्षकांची प्रतिक्रिया न्याहाळीत बसणे हा माझा आवडता छंद आहे. बाई सभेत आल्या की विरोधकसुद्धा चेहरा सस्मित करून सावरून बसतात— अर्थात विरोध करण्यासाठी. आणि काँग्रेसच्या खासदारांची अवस्था तर मनोरंजक होते. सारे जणू प्रसन्न व प्रफुल्लित होतात. एखादा खासदार बोलत असताना बाई आल्या तर तो लगेच आवाज उंचावून छाप पाडण्यासाठी नाट्यमय हावभाव करू लागतो. माझ्यासारख्या त्रयस्थास हा गंमतशीर फरक जाणवतो तर बाईंना तो फरक नक्कीच कळत असेल. एकच गोष्ट खटकते, बाई वडिलांप्रमाणे 'अभ्यासू' नाहीत. खासदार शिरा ताणून ताणून बोलत असतात पण यांचे डोळे

# दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा

## लेखांक तीन

---

दादूमिया

दुसरीकडेच लागलेले असतात व लक्ष आणखी तिसरीकडेच असते. त्यांच्या बोलण्यात धार असते पण खोली (Depth) आढळत नाही व त्यामुळे मन निराश होते.

अर्थात फार ज्ञानातही मजा नाही. त्याने नेहरूंचा 'हॅम्लेट' झाला. बाईंचा आत्मविश्वास त्यांच्या अज्ञानाच्या पोटी जन्मास आलेला वाटतो. ह्या ओव्हर–कॉन्फीडन्सचे उत्कृष्ट चित्र मुंबापुरीकरांना गेल्या पंचवीस ऑक्टोबरला पहायला मिळाले. डोक्यावर तिरंगी झेंडा व टिळक आणि विठ्ठलभाई पटेल समोर साक्षीस ठेवून बाईंनी थाटात गर्जना केली, "I won't quit now" पुढील भाषणात मोठ्या दिमाखाने सांगून टाकले, "अप्पा, मोरारजी आदी नेत्यांनी काँग्रेसच्या धोरणापेक्षा निराळे धोरण स्वीकारून समाजवादाचा घात केला. त्याचे पुरे पारिपत्य केल्याशिवाय मी राहणार नाही. I will continue to serve the people and the country."

मध्यंतरी एव्हररेडी बॅटरीच्या नव्या मॉडेलची जाहिरात आली होती. ती वाचून माझा एक श्रीमंत स्नेही ते नवे मॉडेल खरेदी करण्यासाठी लगेच दुकानात धावला. दुर्दैवाने मीही त्याच्याबरोबर होतो. तो दुकानदार ऐटीत सांगत होता, "याचा रीफ्लेक्टर फार सुंदर लाईट रीफ्लेक्ट करतो. आणि याचे बटण चटकन् उघडबंद होते. बल्बचा लाईट छान प्रकाश देतो."

मला हसू आवरेना. मी त्या दुकानदारास विचारले, "बॅटरीच्या या साऱ्या भागांचे कामच आहे ते. त्यात नवीन काय मोठे?"

दुकानदार माझ्यावर भडकला. त्याला भीती वाटली, मी त्याचे नवीन भोळे गिऱ्हाईक घालविणार!

दिल्लीची दुकानदारीणबाईदेखील आपल्या राजकीय धंद्यात बऱ्याच वाकबगार आहेत. उत्कृष्ट सेल्समन् आहेत. कारण गिऱ्हाईके भोळी व अज्ञ आहेत. नाहीतर "Continue to serve the people and the country" याचा अर्थ काय? बाईसाहेब, हेच तुमचे काम आहे. त्यासाठी तर आम्ही तुम्हाला निवडून दिले आह. आणि तेवढेच काम तुम्ही करावे अशी आमची अपेक्षा आहे.

मराठी व गुजराथी गिऱ्हाइके एकंदरीत बरीच 'पॅक' वाटली मला. बंगाल व केरळात तीच गोष्ट आहे. पण परवा उत्तर भारतात – अगदी थेट (अटारी) भारत-पाक सरहद्दीपर्यंत – मी जाऊन आलो व एक गोष्ट ठळकपणे माझ्या नजरेत भरली. बाईंनी या भाबड्या उत्तर हिंदी लोकांवर चांगले इंप्रेशन मारले आहे. 'जबतक चंद्रा तबतक इंद्रा' ही त्यांची घोषणा हृदयापासून आलेली वाटली मला. रस्त्यावरचा सामान्य माणूस या इंद्रादेवीस खरोखर देवी मानतो भारतात देवी वा देवपूजा भलतीच पसंत आहे. तेहतीस कोटी देव पुरत नाहीत म्हणून की काय पीर, मशिदी, बाबा व क्रॉस हे लोक भाविकपणे पूजतात. नेहरूंना हे श्रेय निश्चित दिले पाहिजे की, त्यांनी आपली कोणासही पूजा करू दिली नाही. ही ताकद अगदी

आर. एस. एस. पासून ते 'माव' छाप कम्युनिस्ट संघटनेपर्यंत कोणा एकाही संस्थेच्या पुढाऱ्यात नव्हती व आजही आढळून येत नाही. 'इंद्रा' गांधींनी लोकांचा हा श्रद्धेचा भाग, हा वीक् स्पॉट, हे नर्मस्थान अचूक ओळखले आहे.

पुढाऱ्यांची देवाप्रमाणेच अवस्था होते. कारण पुढाऱ्यांना मोठे बनविणे हे त्यांच्या भक्तांवर अवलंबून असते. इंदिरा नेत्या झाल्या आहेत त्या त्यांच्या अद्वितीय धोरणांमुळे (Policies) नाही तर राजकारणी डाव (Tactics) खेळून. टिळक-गांधी-नेहरूंसारख्या पुरुषोत्तमांचे युग गेले. हे युग सर्वच क्षेत्रातील धंदेवाईक खुजांचे युग आहे. इंदिरा गांधींचे राजकीय डावपेच मात्र मोठे कुशल व शिकण्यासारखे आहेत. त्यांची राजकीय चाल व पवित्रे खास अभ्यास करण्यासारखे जरूर आहेत. विशेषत: भारतीय राजकारणातील बदल ज्यास अभ्यासावयाचे असतील त्यासाठी.

नेहरू व त्यांची सुकन्या इंदिरा यांच्या राजकीय पार्श्वभूमीत कमालीचा सारखेपणा दिसून येतो. हा 'इत्तेफाक्' म्हणावयाचा. पंडितजी एका थोर नेत्याचे सुपुत्र. त्यांची सुकन्या इंदिरा. मोतीलाल व नेहरू याचे एके काळी परस्परविरोधी धोरण होते. पण मुलाने वडिलांना गांधीवादी बनविले. इंदिराजी यंग तुर्क. त्यांनी नेहरूंना जास्त रॅडीकल केले ! नेहरू कमलेच्या निधनानंतर विधुर झाले व त्यांनी आपल्यास पूर्णपणे गांधीजींच्या राजकारणात वाहून घेतले. इंदिराबाई पती जिवंत असतानाच जवळजवळ एकाकी जीवन कंठीत होत्या. फिरोझ मरण पावल्यावर काँग्रेस पक्षाच्या राजकारणात त्यांनी संपूर्णपणे लक्ष घालण्यास सुरवात केली. नेहरू संवेदनाशील होते. इथे मात्र फरक आढळतो. बाई पुऱ्या आतल्या गाठीच्या, सूड घेणाऱ्या व डाव ठेवणाऱ्या आहेत. त्या राजकारणात अगदी घट्ट अंत:करणाच्या आहेत. नेहरूंप्रमाणेच कोणाशी कधी दोस्ती जोडावी व केव्हा कोणास लाथ मारावी हे त्यांना चांगले ठाऊक आहे. रुपयाचे अवमूल्यन केले त्यानंतरची लोकसभेतील गोष्ट आहे. विरोधकांनी बाईंच्या चिंधड्या केल्या खास वाग्बाणांनी. काँग्रेसजवळ त्यावेळेस कोणीही अवमूल्यनाच्या बाजूने बोलणारा खंदा वीर हजार नव्हता. स. का. पाटील उठले व त्यांनी उत्कृष्ट भाषण ठोकून बाईंची अब्रू वाचविली. स. का. पाटील व बाई यांचे संबंध कधीच चांगले नव्हते. पण सायंकाळी पाटील काँस्टीटयूशन क्लबमध्ये पत्ते खेळत असताना बाईंकडून एक खास नोकर पाटीलांना भेटला व त्याने बाईंची चिठ्ठी पाटीलांना दिली. बाईंनी स. का. पाटीलांचे अंत:करणपूर्वक आभार मानले होते. पाटीलबुवा हा खुश !

या खुश करण्याच्या कलेचे मानसशास्त्रदृष्ट्या स्पष्टीकरण सोपे आहे. विद्यार्थी फार हुशार नसला की, तो इतर क्षेत्रांत चमकून दाखविण्यासाठी खटपट करतो. चांगल्या क्वालीफाईड डॉक्टरपेक्षा इतर अनक्वालीफाईड डॉक्टर्स जास्त बोलके, छाप मारणारे व नम्र असतात. इंदिराजींजवळ राजकीय ज्ञान कमी असले तरी राजकीय युक्त्या ( Tactics) भरपूर आहेत.

त्या जोडीला त्यांच्याजवळ श्रीमंत मुलींजवळ जी बेफिकीर वृत्ती दिसून येते ती आहे. बाईंच्या आत्याबाईंनी मला बाईंच्या बेफिकीर, बेदरकार व बेहिशोबी वृत्तीच्या खूप गोष्टी सुनावल्या होत्या. आत्याबाईंचा घुस्सा आहे बाईंवर. चक्क वानप्रस्थाश्रम घ्यायला लावला बाईंनी त्यांना. खासदार पददेखील नाही ! "फार दादागिरी करीत होत्या ना भावाच्या राज्यात, आता भोगा फळे," या सूड बुद्धीने बाईंनी त्यांना दूर केले. तर मोरारजींची काय कथा ? रडत असतात, "मला वांग्याबटाटयाप्रमाणे दूर फेकले की हो !" आणि ही बेफिकीरी टिकवून धरण्यासाठी खानदानी दाखविण्यासाठी, पैशाचा पाठिंबा हा हवाच. तो बिर्लाजींसारख्यांनी नाही दिला की लगेच आव्हान: "आ जाव !"

राजकारणी माणूस आपल्या दुर्गुणांचेही भांडवल बनवून आपला फायदा काढतो. बाईंजवळ उत्कृष्ट "शोमनशिप्" आहे. याचा अर्थ खोटयाचे खरे करून दाखवायची विद्या, नव्हे 'किमया' चित्पावनी व शुद्ध पुणेरी कटु भाषेत सांगायचे झाल्यास, बाई चक्क खोटे बोलतात ! पण बाईंना त्याचा फायदा केवढा झालाय. त्यांनी म्हणे आनंदभवन देशास 'दान' केले ! आम्ही हीच गप्प त्यांच्या पित्याविषयी व आजोबांविषयी ऐकत होतो ! दान याचा अर्थ सरकारी खर्चाने त्या भव्य वास्तूची देखभाल करवून घेणे. याचा प्रापंचिक अर्थ आत्याबाईस टुकटुक ! आणि राजकीय अर्थ प्रसिद्धी व लोकप्रियता !! तीच गोष्ट साखरेच्या भावासंबंधी. आज दिल्लीतील सामान्य माणूस खुश आहे, दिल्लीचा माणूस हा कशाला विचार करतोय की साडे पाच रुपयाहून हा भाव अडीच रुपयांवर का, कसा व कोणी आणला ते. त्याला पाहिजे असतो 'रिझल्ट'. लोक उघडपणे म्हणतात, 'जे जनसंघास साधले नाही, जे अर्थमंत्री मोरारजीस साधले नाही ते इंदिराजींनी करून दाखविले. त्यांनी आमची दिवाळी चांगली घालविली. जनसंघाचे लोक विचारतात. 'अरे पण, सरकार का आमचे आहे ?' कोण बिचाऱ्यांचे ऐकून घेते ? उलट त्यांनाच ऐकून घ्यावे लागते, 'जब तक चंद्रा तब तक इंद्रा !'

बाईंनी बेशिस्त आणली म्हणून फार मोठ्या प्रमाणात जाणत्या लोकांचा त्यांच्यावर घुस्सा आहे. बाईंचे म्हणणे, 'होय, आणली मी बेशिस्त घरात. पण त्यामुळे मी तर टिकून आहे ना गादीवर' सध्यांचे युगच बेशिस्तपणाचे आहे. त्या दुर्गुणाची मी तरफदारी करीत नाही. पण इंदिराजी शिस्तीत वागत्या तर सिंडीकेटच्या लोकांनी त्यांना खाऊन टाकले असते. आजच्या विद्यार्थ्यांची तीच गत नाही का ? खऱ्या गुणांच्या विद्यार्थ्यांची कोठे कोण कदर करते ? सारी कदर लाचलुचपतीची. विद्यार्थ्यांनी बंडाचा झेंडा उचलावा नाहीतर काय करावे ? आणि उगीच मुकाटपणे त्यांनी नालायक प्राध्यापकांचा नादानपणा व नाजूक भानगडी का म्हणून सहन कराव्यात ? अर्थात् ह्या सर्व प्रकारात 'मर्यादा' नावाची एक चीज फार आवश्यक असते. ती बाईंजवळ नाही. त्यांनी कांग्रेसच्या सभासदांना बेशिस्त

शिकविली. आणि हेच सभासद उद्या हेच बेशिस्तीचे अस्त्र बाईवर बूमरँग करणार! हा इतिहासाचा नियम आहे. गांधींची असहकाराची चळवळ आज भोवतेच आहे ना त्यांच्या वारसांना ? पण त्यांनी ती चळवळ हाती घेतली नसती तर त्यावेळेस लोकजागृती कशी झाली असती ?

बाईंवर 'परकीयांचे वर्चस्व' आहे व त्या 'अँटी-हिंदू' आहेत हे आरोप अंशतः खरे आहेत.

परकीयांचे वर्चस्व का, कसे व किती आहे आणि ते कोठवर जाईल हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे.

दिल्लीतील साऱ्या सत्ताधारी लोकांनी जे कटु सत्य ओळखले ते सत्य बाईंनी पुरेपूर ओळखून चांगले वापरले आहे. ते सत्य फार कडू आहे व सहजासहजी स्वीकारले जाईल असे नाही. ते सत्य म्हणजे, 'Every Hindu has his own price.' ती किंमत द्यावी व कोणताही हिंदू विकत मिळतो. या नियमास चार दोन अपवाद कदाचित् असतील. पण ज्यास अपवाद नाही तो नियम कसला ? एकदा तुम्हाला कळले की याची अमुक किंमत आहे की मग तुम्ही त्याच्या 'फॉर' किती राहणार व 'अँटी' किती राहणार हे तुमच्या त्यावेळेच्या गरजेवर अवलंबून राहील !

जगात या सत्यशोधनामुळे 'हिंदू' या शब्दास किंमत राहिलेली नाही. आणि आज हिंदुत्वाच्या राजकीय अभिमान्यांत त्या शब्दाचे Revaluation करण्याची गरजही भासत नाही, ही सर्वात मोठी शोकांतिका होय. म्हणून 'आम्ही पूर्वी असे होतो नि तसे होतो' हा भूतकाळाचा आधार घेण्याची आवश्यकता भासते त्यांना. बेटयांनो, पूर्वीचे सोडा. आज काय आहे ते बोला ना ! या दृष्टीने मला वाजपेयीजींचे बुद्धी-कम्-श्रद्धावादी नेतृत्व फार पसंत आहे. हा बालब्रह्मचारी विज्ञाननिष्ठ आहे, पोथीनिष्ठ नाही. पण त्यांना इंदिराजींनी भारावून टाकले आहे अशी कुजबूज जनसंघाच्या गोटात दुर्दैवाने ऐकू येते. Jealoucy चा भाग त्यात असेल, इतरही काही कारणे जबाबदार असतील. पण विरोधकात फूट पाडायचे बाईंचे कौशल्य ? आपको माननाही पडेगा !

समाजवादी गोटात अशीच बेदिली बाईंनी पेरली. एस्. एम्. जोशी या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुढाऱ्यास देशहित कळत नाही असे मी कसे म्हणू ? पण 'फार कळते' या खोट्या भरवशावर विसंबून त्यांनी सध्या बाईंचा जो अनुनय चालविला आहे तो धोकादायक आहे. दिल्लीत मला अनेकांनी 'पुण्याच्या तीन ब्राह्मणांनी समाजवादी असून झगडत का रहावे, त्यापेक्षा काही Constructive कार्यक्रम हाती का घेऊ नये.' असा नाजूक पण अवघड प्रश्न विचारला. 'गोरे, लिमये व जोशी यांना दुसरे काय करता येणार ? तुम्हाला पुण्याच्या लोकांची भांडणाची Speciality ठाऊक नाही, सरकार', असे मी खरे बोललो तेव्हा ते लोक मोठे गोंधळून गेले.

त्यासाठी, पुरी तीस वर्षे गांधीजींनी व नेहरूंनी या ब्राह्मणांना कसे झुंजवत ठेवले व कॉंग्रेसहाऊस त्यामुळे कसे 'सेफ' राहिले ( नाहीतर, सदाशिव पेठेऐवजी तो भाग जळला असता ! ) त्याचा इतिहास स्पष्टीकरणासाठी मला त्यांना सांगावा लागला. त्यांनी ब्रिटिशांपासून हा 'धडा' उचलला होता. इंदिरा गांधी वडिलांचीच गादी पुढे चालवीत आहेत या बाबतीत ! समाजवादी घराप्रमाणे साम्यवादी घरही बाईंनी 'फोडले' आहे ! एका गटाविरुद्ध दुसरा गट ! हे 'संशयाचे वातावरण' निर्माण करण्याचे जे कसब बाईंजवळ आहे त्याचे वर्णन म्या पामराने काय करावे? बाई, त्या कसबासाठी तुम्हाला दंडवत असोत.

के. के. शहा तर गुजराथी. आणि मोरारजींचा माणूस. मोरारजींचे ज्यांच्यावर अनंत आर्थिक व राजकीय उपकार आहेत असा सद्गृहस्थ ! फत्तेसिंगराव गायकवाड यांना खऱ्या अर्थाने 'ऋणी' असणारा माणूस ! अशा गृहस्थास बाईंनी वरचेवर भेटायला बोलावले, आणि मोरारजी गटात संशयाचे पिशाच्च उभे केले. समजा, हा गृहस्थ फुटला, मोरारजींना दबला तर प्रचाराच्या बाबतीत आपल्यास धोका देऊ नये म्हणून बाईंनी सावधगिरीने के. के. शहांच्या हातचे नभोवाणी खातेच काढून घेतले. ते इतक्या सफाईने की, शहांना शेवटपर्यंत त्यातील 'राजकारण' कळलेच नाही. कळले त्यावेळेस त्यांनी बाईंचा धसकाच घेतला : 'समजा, मी फार गडबड केली की, लाथच बसेल मला.' मोरारजी गटात डीव्हॅल्युएशन् झाल्यामुळे के के. शहांचा रस्ता तिकडूनही आपोआपच बंद झाला होता. अशा परिस्थितीत तुम्ही आम्ही जे गणित मांडू तेच गणित के. के. शहांनी मांडले व आपले आसन स्थिर ठेवले. फत्तेसिंगराव गायकवाडांना जेव्हा हे सारे राजकारण कळून चुकले तेव्हा त्यांनी विचार केला, या अस्थिर कुबडीचा आधार घेण्यापेक्षा आपल्या प्रांतात आपल्याच स्थिर पुढाऱ्यांना मदत करून लोकप्रियता का न मिळवा? "Remember, you are afterall a foreigner in Gujarat", ही धमकी शेवटी लोकशाहीमुळे त्यांनी ऐकली खरी. पण बाईंनी त्यांनाही नाचवून त्यांची नाचक्की केली हे काय कमी आहे?

कामराजांना बाईंनी असेच नाचविले. कामराज अगदी अजीजीने सांगत होते, 'बाईंचे काय ऐकता ? त्या अशाच दोघांमध्ये जुंपवून देतात ! मध्यंतरी माझ्याशी चर्चा करून मगच मोरारजीभाईंना डच्चू देण्यात आला असे जाहीर करून त्यांनी असे भासविले की, मीच जणू मोरारजीभाईंना काढण्याचा सल्ला दिला होता ! मला तेवढ्यासाठी तर एक जाहीर स्टेटमेंट प्रसिद्ध करावे लागले. कामराजांचे रडणे आक्रस्ताळी नाही याची मी मोरारजीभाईंकडून नंतर खात्री केली.

अशोक मेहतांना आपल्या मंत्रिमंडळात घ्यायच्या वेळी कामराजांनी सल्ला दिला होता असे बाईंनी खोटेच उठविले. कामराज म्हणाले, 'हे काही खरे नाही. खाजगी संभाषणांचा गौप्यस्फोट करणे हे मूळातून चुकीचे धोरण आहे. मला त्याचा

फार तिटकारा आहे. अशोक मेहतांना मंत्रिमंडळात घ्यायचे त्यांनी नक्की केल्यावरच आमचे बोलणे झाले. आणि मी असे करणार आहे असे त्यांनी मला प्रथम सांगितले. अगदी स्वतःहून, त्यात माझ्या सल्ल्यामुळे अमुक झाले असा वाद येतोच कुठे ? '

बाईंनी पाहिले असेल, अशोक मेहता व इतर बुढ्ढे राजकारणी यांच्यात लढत लागली तर बरेच आहे. (पाटील व इतर सिंडीकेट सभासद यांच्यामधील लढा नजीकच्या भविष्यात अपेक्षित आहे– बघू या !) निजलिंगप्पा किंवा कामराज यांची नुकती प्रसिद्ध झालेली पत्रे पहा. काय धारदार, समर्थ व मुद्देसूद इंग्रजी आहे. ती भाषा सारी अशोक मेहतांची ! अशोक मेहता समाजवादी व नेहरूंचे एके काळचे शिष्य. अशोक मेहता सिंडीकेटमध्ये कसे विचित्र वाटतात. वयाच्या दृष्टीने पाहिले तर ते या बुढ्ढा क्लबात बसूंच शकत नाहीत. उदाहरणार्थ मोरारजींचे वय ७३, निजलिंगप्पांचे ६७ व कामराजांचे ६६. त्याउलट इंदिराजींचे सहकारी तरुण आहेत. दिनेशसिंग ४४ वर्षांचे, चंद्रशेखर ४२ व मोहन धारिया ४४. डॉ. करणसिंगही असेच तरुण आहेत. सुब्रम्हण्यम् तरुण दिसतात, पण आहेत ५८ वर्षांचे. चव्हाण साठीचे व फकरुद्दीन व जगजीवनराम अनुक्रमे ६४ व ६१ वर्षांचे. बुढ्ढा क्लबात तरुणात तरुण तारकेश्वरी सिंहा ! पण त्याही पन्नाशीच्या बाई. साहजिकच ही वृद्ध मंडळी अशोक मेहतांसारख्या मध्यम वयाच्या तरुणास सोडण्यास कशी तयार होतील ?

प्रेम व युद्ध यात सर्व क्षम्य असते असे म्हणतात. इंदिराजी सिंडिकेटच्या या पानिपतावर आपण करतो ते सारे धर्म्य व समोरचे करतात ते सारे पाप असेच समजून चालल्या आहेत. हे खोटे बोलायचे किंवा 'ध' चा 'मा' करण्याचे धारिष्टय त्यांच्यामध्ये एकदम कोठून संचारले ते आपल्याला कळत नाही. उदाहरणार्थ, गेल्या १७ मेस इंदिरागांधींनीच संजीव रेड्डींचे नाव काँग्रेस अध्यक्षपदासाठी सुचविले होते. पण सिंडीकेटने त्यांना पाठिंबा देण्याचे ठरविताच त्या एकदम उलटल्या व गिरी या विरोधी पक्षाच्या माणसास त्यांनी 'आपले' म्हटले. बिचारे संजीव रेड्डी ! स्पीकरचेही पद गेले व अध्यक्षाची खुर्चीदेखील ! दुसरे उदाहरण एस. सी. छाब्रा यांचे. इंदिरागांधींनी या छाब्रास पद्मश्री हा किताब देवविला. यांच्यावर तर सी. बी. आय. चा तपास चालू आहे. त्यांच्यावर क्रिमीनल गुन्ह्याचा आरोप आहे ! आधीच काँग्रेसचे नाव 'चोरांची टोळी' म्हणून खराब झालेले आहे. 'गुन्हा केला असलात तर गांधी टोपी चढवा व काँग्रेसमध्ये दाखल व्हा,' अशा अर्थाचे एक गाणे मी आसामी भाषेत ऐकलेले आहे. आसामात तुम्ही गांधी टोपी चढविली तर पोलीस तुमच्या मागे लागतात; त्यांना तुम्ही स्मगलर्स आहात असा संशय येतो. इतर प्रांतांत काँग्रेसमनांचा रेकॉर्ड यापेक्षा चांगला नाही. अशा परिस्थितीत इंदिरागांधींनी पावले व्यवस्थित टाकली नाहीत तर पक्षाचे भवितव्य काही ठीक नाही. एका यंग तुर्काचा शेरा यावर विचार करण्यासारखा आहे,

"उठसूठ इंदिरा गांधींना दोष देण्याची वाईट सवय सिंडीकेट स्काऊंड्रलसप्रमाणं तुलाही लागली आहे. हा बेशिस्तीचा सडा १९३१ सालपासूनचा आहे. महात्मा जींचे खरे म्हणजे कोण ऐकत होते? त्यांच्या साऱ्या शिष्योत्तमांच्या मुलांनी - बेटा डाह्याभाईपासून बेटा कांतीपर्यंत – काळा बाजार करून लाखो रुपये कमावले गांधींनी थैलीशहांच्याविरुद्ध काहीही केले नाही. नेहरूंनी तर त्यांच्यापुढे नांगीच टाकली होती. शास्त्रीबुवांना तर थैलीशहांनी बॅकपॉकेटमध्ये टाकले होते. इंदिरा गांधी या बाबतीत अयशस्वी ठरल्या तर आम्ही त्यांच्याविरुद्ध बंड पुकारू. आता आम्ही या बाबतीत ऐकणे शक्य नाही."

"माझ्या शुभेच्छा कळवा इंदिराबाईंना."

"मी पोस्टमनचे काम कशाला करू? आपणच का भेटत नाही त्यांना?"

"पण –"

'हल्ली त्यांना भेटणे सोपे आहे. आणि आपण तर गुजराथेतून आला आहात. प्रथम भेटतील त्या तुम्हाला. त्यांना गुजराथी भगत पाहिजे आहेत. मोरारजींचा जोर हितेंद्रभाईंच्या श्रीमंत मिनिस्ट्री सत्तेवर आहे, म्हणून हे सत्य त्यांना ठाऊक आहे!'

आणि खरंच, इंदिराजींना भेटणे सध्या फार सोपे वाटले मला. सिक्युरीटी मेझर्स का घेत नाहीत त्याचे मात्र कोडे वाटले. एका बाजूस तर 'मला खुनाच्या धमक्या येतात' असे त्या सांगतात. आणि दुसऱ्या बाजूस कोणीही त्यांना भेटावे असे मुक्त वातावरण. साध्या पोशाखात सी. आय. डी. असतील, नाही असे नाही. पण बंदोबस्त अधिक हवा.

मला तर खुनाच्या धमकीच्या पत्रांचा संशय वाटतो. केवळ प्रचार तंत्र. या हिंदुस्थानात स्त्रीच्या वाटेस कोणी जाईल असे मला वाटत नाही. बाईंची खाजगी गुपिते ठाऊक असणारी मंडळी दिल्लीत डझनांच्या भावाने आहेत. पण त्याविषयी ते बोलत नाहीत, लिहीत नाहीत. कारण हिंदु संस्कृतीचा भारतीय हिंदू, मुसलमान ख्रिस्ती किंवा अन्य व्यक्तींवर नकळत झालेला परिणाम! ती सारी गुपिते कधी काळी प्रकाशात आलीच तर ती चॅट्टु अँड् विंडोस, अॅलन किंवा मॅक्मिलन वगैरे परदेशी मंडळी जाहीर करतील, भारतीय नाहीत. एका महत्त्वाच्या विरोधी पक्षाचे भूतपूर्व अध्यक्ष मला सांगत होते, "वो औरत है इसी लिये, नही तो हम उसको वैसीही फाडके खा जाते!"

"लेकिन राजनीतीमे पुरुष या स्त्री ये भेद आप रखते हो!"

"क्यूं नही जी? ये भारतीय राजनीति है ना? भारतीय कल्चरका प्रभाव पडना स्वाभाविक है!"

मी मनात म्हणालो, "याचा अर्थ बाई वर्ष दोन वर्ष तरी हटत नाहीत."

सत्तास्थानी घट्ट चिकटून राहण्यासाठी तीन विजा आवश्यक आहेत

१) संघटना, २) प्रचार व ३) लोकप्रियता. आज संघटनेची जी काही पकड आहे ती सिंडीकेटपाशी आहे. यंग तुर्क बेशिस्त पोरे! त्यांना संघटनेचे पथ्य जमणारे नाही. म्हणून तर बाईंनी यशवंतरावांना जागी टिकविले आहे. यशवंतरावांचा कावा बाई ओळखून आहेत. पण काँग्रेस वजा यशवंतराव म्हणजे 'केऑस' हे समीकरण त्या छान जाणतात. आणि यशवंतरावांना प्रतिस्पर्धी असावा या स्वार्थी हेतूने त्यांनी कम्युनिस्टांना जवळ केले आहे. कम्युनिस्ट आले म्हणजे त्यांच्या संघटनेचा फायदा आपोआप आलाच. आणि ही संघटना देशी नाही तर विदेशी! बाई लोकप्रिय नाहीत. पण उत्कृष्ट प्रचाराच्या जोरावर त्यांना लोकप्रियतेचा 'हवा' निर्माण करणे अवघड नाही. उत्कृष्ट प्रचार हा पोरखेळ नाही. सिंडीकेटला सारे पेपरवाले स्वतःचे असून कोठे जमले ते पहा ना! फ्रँक मोरेसनेसुद्धा हळूहळू आपला स्वर खाली आणला विरोधाचा! 'सरशी तेथे पार्शी' कशाला, अँग्लो इंडियन, छेः छेः, सारेच, तुम्ही नि आम्हीदेखील. महाराष्ट्रातील एका अग्रगण्य मासिकाच्या संपादकांनी एका महिन्याच्या अग्रलेखात इंदिरागांधींना 'दे शिव्या दे शिव्या' दिल्या होत्या. त्यावेळी सिंडीकेट इंडिकेटवर मात करणार अशी त्यांची खात्री असावी पुढील महिन्याच्या अग्रलेखात, 'चला; बाई, तुम्ही जिंकलात तर खरे, आता आम्ही सुचवितो त्याप्रमाणे करा बघू!' असा स्वरात बदल झाला होता. यशवंतरावांच्या गृहमंत्रालयात मी सहज ही गोष्ट बोललो तेव्हा मिस्कील उत्तर ऐकावयास मिळाले, "That is Marathi Journalism! Free and Fearless!"

स. का. पाटीलबोवांनी इंदिरा गांधींविरुद्ध काँग्रेस फंडाचा गैरवापर केल्याचा जबरदस्त आरोप केला होता. पाटीलबोवा नंतर एकदम का चूप झाले ते कळत नाही. लोकसभेत सी. आय. ए. चा रिपोर्ट प्रसिद्ध झाला होता. त्यात काँग्रेसला चक्क विदेशी पैसा भरपूर प्रमाणात उपलब्ध होतो हे सिद्ध झाले आहे (स्पष्टवक्ता संसोपा सोडला तर साऱ्याच पक्षांना विदेशी व देशी कंपन्यांच्या द्वारा पैसे मिळतात हेही त्या अहवालात आहे!) कंपन्यांच्या रिपोर्टीप्रमाणे ह्या काँग्रेस पक्षास किती पैसे मिळतात ते कळले की धक्काच बसतो. रशियाकडून हे लोक कोटी कोटी रुपये उकळीत असावेत असे मानावयास खूप आधार आहेत. इंडिकेट व सिंडीकेट–दोन्ही ह्या बाबतीत सारखेच डाकू आहेत बरं का. उदाहरणार्थ, सिंडीकेट नेता चंद्रभानु गुप्ता यांना वाढविण्यासाठी पन्नास लाख रुपयांची थैली अर्पण करण्यात आली!

एका काँग्रेसी खासदाराने मला पुढील माहिती पुरविली. बंगलोर अधिवेशनात एका कंपनीच्या प्रतिनिधीने केवळ ४५००० रुपयांची कॉफी काँग्रेसी लोकांना पाजली! इंदिरा सरकार ह्या आकडा ४५,००० नाही फक्त ६,००० रुपये आहे असे कबूल करते. खासदाराने स्पष्टीकरण केले, 'बरोबर आहे, ६,००० रुपयांची कॉफी. बाकीच्या हजारांचे दूध व साखर.'

दिल्ली येथे २२ व २३ तारखेस काँग्रेसच्या महासमितीची विशेष बैठक भरली होती. त्यावेळेस मी तेथे होतो. तेव्हा टॅक्सी, चहा, कॉफी, धोबी व न्हावी ह्या साऱ्या सवलती मोफत होत्या. ह्या म्हणे जनतेने सवलती उत्स्फूर्त दिल्या होत्या. वा: रे जनता व वा: रे जनतेचे थैलीशहा प्रतिनिधी! त्या आधी काही दिवस एका कंपनीने सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांतून 'इंदिरा गांधींना पाठिंबा द्या' अशा जाहिराती झळकाविल्या होत्या. अर्थात नाव होते यंग ट्रेडर्स इन् दिल्ली. इंदिराजी समाजवाद मानतात पण अलिशान राजमहालात वास्तव्य करतात व मिंक कोट मागून घेतात. त्यांचे सहकारी सुखाडीया – राजस्थानातील चोरट्या सोन्याचे आयात प्रकरण – जगजीवनरामांनी गेल्या दहा वर्षात प्राप्तिकरच भरला नाही. बिजू पटनाईक, बक्षीजी, कैरों – किती नावे सांगू व लेखणी विटाळू?

ह्या पैशांशिवाय राजकारण होणे नाही, ही लाचलुचपत अटळ आहे असे मी चुकून एका संसोपाच्या पुढाऱ्याशी चर्चा करताना बोलून गेलो. तो भडकला व ओरडला, "आप जैसा समझदार आदमी ये बात करने लगा? फिर इंदिरा सरकार देशकी राजनीतीको भ्रष्टाचार मुक्त करनेके लिए व्यापक और स्थायी जांच – आयोग की मांग कैसी करेगी? लोकपाल और लोकायुक्त की व्यवस्था को इंदिराजी कारगर होने कैसी देंगी? इस देशको राजनीतिको 'धनतंत्र'ने बिगाड दिया है। पूंजीपतीयो, नौकरशाहो और राजनेताओ की मिलीभगतने भारत के जनतंत्रको धनतंत्र – चंदातंत्र – पूसतंत्रमे बदल दिया है।"

पुढे कळले की ह्या स्वारीनेदेखोल बिहारमध्ये सत्तेवर असताना खूप पैसे खाल्ले होते. आणि तेही तेथे दुष्काळ चालू असताना –

या अल्ला!

इंदिरा गांधींवर टीका करण्याचा काय नैतिक अधिकार आहे असल्या विरोधकांना?

बोलाचीच कढी, बोलाचाच भात. नुसती लोकप्रियता मिळविण्यासाठी केलेली टीका सफल कशी होईल? एसेमना काय हे ठाऊक नसेल?

जाने दो, बंदे, नाहीतर 'सत्यकाम' पिक्चरमधल्या हिरोसारखी अवस्था व्हायची आपली. फुकट मरायचे!

प्रचारात मात्र वडिलांच्या शंभर मैल पुढे आहे ही नेहरूंची सुकन्या! आणि त्याचे सारे श्रेय त्यांचा गोबेल्स् इंदर गुजराल गुरुजीस. या दिल्लीस्थ गोबेल्सच्या अवताराने रेडियो, टीव्ही व वर्तमानपत्रे यांच्याद्वारे प्रचाराचा धूमधडाका चालविला आहे. इंदिराजींचा समाजवाद कोणत्या मार्गाने चालला आहे ते पत्रकारांना विचारा म्हणजे कळेल. सिलोनच्या एका सुप्रसिद्ध ज्योतिषाने इंदिरा गांधी जेमतेम वर्ष काढतील असे ज्योतिष वर्तविले होते. लगेच इंदर गोबेल्सने टेलीप्रिंटरवरून ही 'न्यूज आयटेम्' 'कील्' करायचा हुकूम दिला व त्याऐवजी 'सब्स्टीटयूट न्यूज आयटेम्' मिळणार नाही तेही बजावून टाकले. नशिबाने इंडियन एक्स्प्रेसच्या लंकेतील

बातमीदाराने ही बातमी तेथून धाडली व म्हणून लोकांना ती बातमी कळली. नाहीतर 'कील 'च झाली असती. आणि बातमी कसली तर ज्योतिषाची! मग खरंच महत्त्वाची बातमी असली तर इंदरसाहेब काय करतील?

दिल्लीचा टीव्ही सेट म्हणजे इंदिरा गांधींच्या हालचालींचा जिवंत सिनेमाच. काय हुशारीने टीव्हीवर न्यूज आयटेम्स् दाखविल्या जातात. सामान्य माणूस व माळकरी पोर या देवतेच्या दर्शनाने धन्य होतात! हा टीव्हीचा प्रचार दिल्लीपुरताच मर्यादित आहे म्हणून ठीक आहे. नाहीतर बाईंनी साऱ्या भारतभर धमाल उडवून दिली असती आपल्या दृश्य व श्राव्य प्रचार–कौशल्याने! बाईंची शान इतर फाटक्या मंत्र्यांमध्ये उठून दिसते. करणसिंग सोडले तर अशी शान कोणत्याच नेत्यामध्ये दिसून येत नाही. काही बेटे तर नीट दाढीसुद्धा करीत नाहीत. आमचे प्रतिनिधी म्हणायचीसुद्धा लाज वाटते काही श्वेतांबरांना. काम कोणीच करीत नाही. त्यामुळे निदान 'बाई दिसावयास तरी चांगल्या असल्यामुळे लोकसभेत वेळ तरी घालवला जातो' असे डॉ. लोहीयांसारखे लोक स्पष्ट बोलून मन मोकळे करतात.

असल्या निष्क्रिय, संधिसाधू व नालायक मंत्र्यांची व नेत्यांची भाषणे व दौरे 'कव्हर' करण्यासाठी जणू ऑल इंडिया रेडियोचा जन्म झाला आहेत. अर्थात बहुमान इंदिरा गांधींच्या हालचालींना. याचा दोष मी मोरारजींना देईन. चंदा कमिशनने आपल्या अहवालात ऑल इंडिया रेडियो बी. बी. सी. प्रमाणे स्वतंत्र कॉर्पोरेशन असावे असा निर्णय दिला होता. आता मोरारजीभाईंनी आपली चूक कबूल केली की, त्यावेळेसच कॉर्पोरेशन करावयास पाहिजे होते! पण मोरारजीभाई त्यावेळेस सत्तेवर होते. त्यांचाही प्रचार रेडियो तेवढ्याच भक्तिभावाने करीत असे ना? आता हेच लोक बोंब मारीत उठले आहेत. रेडियोचा एकतर्फी अपप्रचार चालला आहे म्हणून!

परवा हितेंद्रभाई देसाई जाहीरपणे म्हणाले की, 'ऑल इंडिया रेडियोच्या बातम्यांच्या खरेपणाविषयी आपल्याला खात्री देता येत नाही.' त्यांचे म्हणणे खरे आहे. इंदिरा गांधींच्या कॉंग्रेस पार्लमेंटरी मिटींगच्या वेळी रेडियोने चक्क ३३० सभासद आल्याचे सांगितले. खरे सभासद होते २१५. साऱ्या वृत्तपत्रांनी हाच खोटा आकडा प्रसृत केला. हे कसे झाले? मी त्यावेळी तेथे होतो. बाईंनी चक्क खोटे सांगितले वार्ताहरांना की, ३३० सभासद हजर आहेत व ५०–६० जणांच्या तारा आल्या आहेत की, ते येऊन राहिले आहेत! परदेशी वार्ताहरांचे ठीक आहे. त्यांना सारे सभासद माहीत नसतात. पण ३००० रुपये पगार घेणाऱ्या टाईम्स किंवा स्टेटस्मन् यांच्या वार्ताहरांनी उभे राहून किती सभासद आले आहेत ह्याची गणती करावयास नको काय? त्यांना मागाहून प्रश्न केला तेव्हा त्यांचे मासलेवाईक उत्तर आले, 'आम्हाला काय ठाऊक, पतप्रधान एवढे खोटे बोलतील? माझा एक मराठी मित्र तेथे अधिकारी म्हणून हजर होता. 'खरं सांगू,' तो

म्हणाला, 'मंत्र्यांना आपण आपली नावे ठेवायची येथे कोणी कामच करीत नाही. Nobody wants to work.' माझ्या मित्राचे हे निरीक्षण खरे आहे याचा प्रत्यय मला दिल्लीत क्षणोक्षणी येत होता.

तारकेश्वरी सिंहा या अगाऊ बाई आहेत. त्या इंदिरा गांधींच्या बैठकीस गेल्या. इंदिरा गांधी पहात होत्या. त्यांच्या डोळ्यासमोर कोणीतरी त्यांना थप्पड मारली. पण पंतप्रधानांनी काही केले नाही. उलट तारकेश्वरींना पोलीसांनी अटक केली ! आणि ऑल इंडिया रेडिओ व दिल्लीची प्रो–इंदिरा वृत्तपत्रे यांनी काय छापावे ? बाईंनी शांतताभंग केल्याबद्दल पोलीसांनी अटक केली. त्यांनी कोणास तरी थप्पड मारण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांनाच लागले ! काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीच्या वेळी निजलिंगप्पांना असाच प्रसाद मिळाला होता. तेव्हा का कोणासही अटक केले नाही ? आणि रेडिओवर अशा थाटात बातमी दिली की, निजलिंगप्पा जणू कोणी चोर होते.

अर्थात रेडियोचा हा पक्षपातीपणा आजचा नाही. मला नीट माहीत आहे की, मुंबई रेडियोवरून पाक्षिक घटनांचे परीक्षण करणाऱ्या एका मित्राने रेडियोवर आपल्या अहवालात अशोक मेहतांना काश्मीरात मारहाण झाली ती बातमी घातली होती. रेडियो अधिकारी म्हणाले, 'साहेब, ही बातमी काढून टाका,' तो खमका होता. तो म्हणे, त्यापेक्षा माझा आजचा कार्यक्रम रद्द करा. तेवढा वेळ अधिकाऱ्यांजवळ नव्हता. म्हणून ते परीक्षण अधिकाऱ्यांनी त्यास वाचून दिले. मात्र राजकीय परीक्षण तेव्हापासून माझ्या मित्राचे जे बंद झाले ते आजपर्यंत. का ? तर सेक्युलर काश्मीरचा धार्मिक आततायीपणा Expose करण्याचे पाप माझ्या मित्राने केले म्हणून ! अत्र्यांचे पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत रामदासांवरचे गाजलेले भाषण (शेवटचेच!) मी माझ्या कानांनी ऐकले होते. त्याचप्रमाणे पुणे रेडियोने त्याचे अंशत: Rebroadcast केले होते तेही मी ऐकले होते. अत्र्यांनी राजवटीला दिलेल्या शिव्याशापांना नेमका अर्धचंद्र मिळाला होता. कारण रामदासांवर चिखलफेक करणारा इसम नादान असला तरी काँग्रेसचा होता ना ?

म्हणून त्रिवेंद्रममध्ये रेडिओविरुद्ध पंचाहत्तर काँग्रेसवाल्यांनी दोन तास मोर्चा नेला होता. त्यांच्या घोषणा खऱ्या होत्या : All India Radio should be converted into a Corporation", "AIR should broadcast news truthfully", "AIR should end favouring Indicate", "AIR is not family property of Indira Gandhi" व "Minister Gujaral, we worn you that Goebbels type of propaganda will not pay." दिल्लीत जनसंघानेदेखील रेडियोविरुद्ध असाच मोर्चा मध्यंतरी काढला होता. पण त्याचा उपयोग काय? इंदर गुजराल हसून मनातल्या मनात म्हणत असेल, 'किस्मत हमारे साथ है, जलनेवाले जला करे '

पहिल्याच दिवशी अविश्वासाचा ठराव आला त्या रात्रीची गोष्ट. पिलू मोदींनी चार झकास भाषण ठोकले. इंदिरा सरकारच्या रबातच्या व इतर नफ्फटपणावर. " Brutus was an honourable man " असे सुप्रसिद्ध भाषण आहे. त्या चालीवर त्यांनी ' who cares ?' हे पालुपद चालू ठेवले होते. त्यांनी व अशोक मेहतांनी इंदिरा गांधी व दिनेशसिंग यांना फाडून खाल्ले त्या दिवशी. पण वार्ताहरांनी पिलू मोदींच्या भाषणाचा एक शब्दही येऊन दिला नाही बाहेर ! आणि अशोक मेहतांच्या भाषणास प्रसिद्धी चार ओळींची ! रेडियोने पिलू मोदी 'बोलल्याचा' उडत संदर्भ दिला ही मेहेरबानी ! त्यादिवशी पिलू मोदी बोलताना कोणी ऐकले असते तर वाटले असते की, हा कोणी हिंदुमहासभेचा प्रतिनीधीच बोलून राहिला आहे ! याची जाणीव म्हणा हिंदुसभेस तरी आहे किंवा नाही ते देव जाणे ! पिलू मोदींच्या भाषेत, ' हू केअर्स ?'

गांधीनगरच्या अधिवेशनात मोठी मजा आली. लोक चार-पाच लाख तरी असावेत. ऑल इंडिया रेडियोचा प्रतिनिधी तेथे होताच. सारे त्यास म्हणतात, " मि. सूद, Report what you have seen over here, otherwise your Inder will say it was thinly attended. " सूदसाहेब उत्तरले, " That could be said even after my reporting truthfully ! "

गांधीनगरहून बडोद्यास परतताना माझ्याबरोबर फिल्म डीव्हीजनचे मुख्य फोटोग्राफर होते. तेही तक्रार करीत होते, ' पाचशे फूट फिल्म मी शूट केली आहे खरी, पण काय उपयोग, येणार फक्त पन्नासच फूट !' मी विचारले, ' आणि मुंबईच्या अधिवेशनाची फिल्म ?' मला बरोबर ठाऊक नाही, पण उघड आहे, तेथे बंधन असणार नाही.' ऑल इंडिया रेडियो, टेलीव्हीजन ( फक्त नव्या दिल्लीत) व सिनेमा यांच्यावरील नियंत्रण मोठे मजेदार आहे. फक्त इंदिरा गटास झुकते माप द्यायची तऱ्हा न्यारी आहे. पण कोणीही सत्तेवर असले तरी असेच होणार, नाही का ? मी वाईट आहे ते (गौतमबुद्ध व त्यांचे अनुयायी साने गुरुजी हे सोडले तर) कोण सांगण्याचे धाडस करेल ? ज्यांनी राजकारणात यशस्वी प्रचाराकडे लक्ष दिले नाही त्यांनी मार खाल्ला. हिंदुमहासभेचे नाव तरी शिल्लक आहे का आज ? त्यांचे भिडे दिल्लीस भेटले होते. त्यांनी प्रांजळपणे कबूल केले, ' प्रचार करावयास आमच्याजवळ पैसाच नव्हता. आणि सावरकरांनी पैशाच्या बाजूस कधी लक्ष घातलेच नाही. त्यांनी नुसते सूचन केले असते तर लक्ष लक्ष रुपये देणग्या हिंदुसभेस सहज एका एका व्यक्तीकडन मिळाल्या असत्या. आज मला वा बाळारावांना कोण देणार देणग्या ? त्यामानाने जनसंघाने चांगला पैसा गोळा केला आहे.' त्यावरून आठवले, दिल्लीचे मेयर हंसराज गुप्ता मला सांगत होते, " जनसंघास निवडणुका लढवणे परवडत नाही हो, फार काम महागात पडते. येथे पैसा खर्चून टाकल्यावर विधायक कार्यक्रमासाठी पैसा कोठून आणायचा ? सत्तेवर असताना पैसा गोळा

करता येईल. सोपे काम आहे ते. पण काँग्रेसला नावे ठेवण्यात काय अर्थ आहे ?" सत्तेवर असताना व बाहेर असताना केवढा फरक पडतो ! एस्. एस्. पी. च्या लोकांची बहुत्रा खात्री आहे की आपण बापजन्मी सत्तेवर येणार नाही, म्हणून की काय वाटेल ती टीका करीत असतात बेटे !

लोकसभेतील 'लोकशाही' इंदिराबाई Exploit करीत असल्याचे दृश्य मी पाहिले व माझा लोकशाहीवरचा विश्वास उडाला. एका मुद्यावर मधू लिमये बोलावयास उभे राहीले. मधू लिमये यांचे बोलणे नेहमीच अभ्यासू असते. ते त्यांच्या बाहीखालून जादूगाराप्रमाणे काय काढतील याचाही काही नेम नसतो. पण त्या दिवशी मी त्यांचे फक्त दोनच शब्द ऐकले, 'अध्यक्ष महोदय.' ते बोलावयास उभे राहिले, एवढयात केरळच्या चार कम्युनिस्टांनी उगीचच बोंबाबोंब करावयास सुरुवात केली. एक अक्षर उमजले नाही लिमयांचे. तेही कंटाळले व खाली बसले. हे सारे स्पीकर धीलनसाहेब 'मला मधू लिमयांना ऐकायचे आहे,' असे पुन्हा पुन्हा सांगत असताना ! दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी लिमयांना म्हणालो, "मधू, "You have disappointed me !" ते म्हणाले, "पण मी काय करू ? That is the new strategy of our Prime Minister." ही मस्त युक्ती आहे. बोलून दिले तर तुम्ही कोणाची अंडीपिल्ली बाहेर काढाल ना ! बाबूराव पटेल अशीच तक्रार करीत होते. खोटे वाटेल, पण त्यांना अजून नीट बोलायलाच मिळालेले नाही ! दात आहेत तेथे चणे नाहीत. ज्यांना खूप बोलायला मिळते. ते बेटे बोलतच नाहीत. पूर्वी राज्यसभा किंवा लोकसभा काय, तेथे ठराविकच वक्ते बोलत. भूपेश गुप्ता व राज नारायण यांचा खूप बोलण्याचा (शंख करण्याचा) मोनोपोली बिझीनेस होता. आज दोघांना लाजवतील अशी बोंबाबोंब करण्यात पटाईत झाले आहेत श्यामनंदन मिश्रा, श्यामधर मिश्रा, खेमचंद चावडा व पुष्पा मेहता. ह्यांची बोंबाबोंब ऐकली की वाटते अराजक लौकरच माजणार ! एवढया बेशिस्तीत बाई मात्र डोळे तिरकस रोखून पंजावर गोरी हनुवटी ठेवून शिस्तीत स्वस्थ बसलेल्या आढळतात.

नेहरूंना हॅम्लेट किंवा डेन्मार्कचा प्रिन्स म्हणत. हे करू का ते करू, अशी त्यांची द्विधा अवस्था होई. मुंबई प्रकरणात तर ते दुतोंडी कसे होते ते सी. डी. नी चांगले दाखवून दिले. बाई तर उस्सेभी जादा दुतोंडी आहेत. पहिली गोष्ट, त्या चक्क खोटे बोलतात. आणि दुसरी गंमत ही की खोटेदेखील इतके Twisted असते की, समोरचा हाय खाऊन मरेल एवढे. अलाहाबाद येथे उदाहरणार्थ त्यांनी विधान केले, "My hands and legs were tied up." त्या पुढे म्हणाल्या, मला समाजवादासाठी पुढे पावले टाकावयाची होती पण ?– Could not do so because of heavy pressure from some Congress leaders." आता विचार करा, हे पुढारी कोणते ? जगजीवन राम ? चव्हाण का फकरुद्दीन अली

अहमद ? कारण पाटीलबाबा, अतुल्य घोष किंवा इतर कामराजांसारखी मंडळी तर त्यांच्या मंत्रिमंडळात आज दोन वर्षे नाहीतच. मोरारजींना तर बाईंनी काल परवा स्वीकारले पण ताबडतोब घटस्फोट देऊन मोकळे केले. मग बाई ज्यांना Congress leaders म्हणतात ते हे कोणते पुढारी ?

मास हिस्टेरीया उत्पन्न करण्यासाठी बोलायचे असेल तर स्वतः बहुधा हिस्टेरीक व्हावे लागते. राम सुभग सिंगांनी मला अचूक सांगितले, "Which party in the world with a will to serve the people, tolerate a leader who files the nomination papers for the high office of the future President of the country and soon after raises a banner of revolt in the name of conscience? Obviously, Mrs. Gandhi has two consciences and clearly one is hypocritical and this act of treachery to the organisation was neither the first nor the last act." बाईंच्या दुतोंडीपणाचे दुसरे उदाहरण देतो. सिंडीकेटला आज त्या शिव्यांची लाखोली देत आहेत : "The bosses and the Syndicate at first did not let me attain the dizzy heights of socialism." पण याच सिंडीकेटने इंदिराबाईंना दोनदा पंतप्रधान बनविले होते त्यावेळची भाषणे व स्तुतिसुमने आठवा.

अर्थात दुतोंडीपणा राजकारणात दुर्गुण ठरलेला नाही. तो सद्‌गुणच मानला जातो. राजमान्य व लोकमान्य नेत्यांची किती उदाहरणे पाहिजेत दुतोंडीपणाची ? मला दुतोंडीपणाचे वाईट वाटत नाही. खेद वाटतो. खेद अशासाठी की, जरा सत्तेसाठी साठमारी चालू होताच ही भावंडे आज एकमेकांचा गळा कापण्यासाठी तयार झाली आहेत. त्याचा फायदा दर खेपेप्रमाणे कोणी गझनीचा महंमद किंवा अब्दाली तर घेणार नाही ना ?

खेदाबरोबर आनंदही वाटतो मला.

आज जी शिवीगाळ ऐकू येते ती तुम्ही-आम्ही केली तर आपल्याला Reactionary, Communal, Narrow-minded वगैरे शेलक्या शिव्या मिळाल्या असत्या. बरे, आपले काम परस्पर होत आहे. आनंद आहे. बच्चो, आगे बढो, और जोरसे.

□ □ □

( यापुढील लेखांक : मोरारजींचा बकरा )



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

### ◻ साडी न मागणारा कॉम्प्युटर

एका पश्चिम जर्मन शास्त्रज्ञाने नुकतेच असे भाकीत केले आहे की, एकविसाव्या शतकात प्रत्येक घरात मोलकरणीचे काम करणारा कॉम्प्युटर बसविण्यात येईल. मला नाही खरे वाटत ! कारण माझ्या माहितीप्रमाणे कॉम्प्युटर यंत्रे बहुतेक वेळ नवकाव्य करण्यात, राहिलेला वेळ लग्ने जमविण्यात अन् त्यातून फुरसद मिळालीच तर ती बेरीज-वजाबाकी करण्यात घालवतात. तेव्हा त्यांना धुणी-भांडी करायला वेळ कसा मिळणार? अन् जरी एखादा कॉम्प्युटर हलाखीच्या परिस्थितीमुळे मोलकरणीचे काम करायला तयार झालाच तरी आमच्या हिला त्याचे काम पटेलच असे सांगता येत नाही. कारण पहिली गोष्ट म्हणजे "बरं का ग सखू..." अशी सुरुवात करून आमची ही शेजारच्या रमाबाईंची नली हल्ली काय काय चाळे करते याचे साद्यंत वर्णन करील तेव्हा सखूप्रमाणे कॉम्प्युटर "काय बाई तरी !' असा रिस्पॉन्स देईल काय? शक्य नाही. नंबर दोन : सखू पलीकडच्या चाळीतल्या उषावहिनींकडंदेखील काम करते. त्या मंडळात भाषण द्यायच्या आधी ते नवऱ्याकडून लिहून घेतात अन् पाठ करतात हे ह्यायली कॉन्फिडेन्शियल स्टेट सिक्रेट सखूइतक्याच अगत्याने कॉम्प्युटर सांगील काय? अर्थात नाही. नंबर तीन : "सखू, ह्यांनी काल आणलेला छानदार फ्लॉवर पॉट मेला आजच माझ्या हातून फुटला बघ ! आता मी तुझे नाव सांगते, तू काही बोलू नकोस बर का?" असे बजावल्यावर सखूप्रमाणे कॉम्प्युटर मुकाट्याने मान डोलवील का? कधीच नाही. आमच्या ह्यिच्या मते सखूमध्ये नसलेला फक्त एकच गुण कॉम्प्युटरमध्ये असू शकेल. – गेल्याच महिन्यात विकत घेतलेली साडी वाळत घालताना "बाई, आता ही विरायला लागली, नवी घ्या," अशी सूचक सूचना कॉम्प्युटर करणार नाही.

### ◻ संपादक खाण्याचे फायदे

एका ब्रिटीश आहारशास्त्रज्ञाने थोड्या दिवसांपूर्वी असे मत प्रकट केले आहे की, आधुनिक युगात आपण नरमांसभक्षण त्याज्य मानल्यामुळे मानवजात एका पौष्टिक अन्नपदार्थाला मुकली आहे. अगदी बरोबर ! परवा टेस्ट मॅच पाहण्यासाठी कॅज्युअल मिळाली नाही तेव्हा साहेबाला खाऊ की गिळू असे मला झाले

होते. – पण हाय ? माझी नतद्रष्ट आधुनिकता या रुचकर मेजवानीच्या आड आली. तरीदेखील तेव्हापासून माझे ठाम मत झाले आहे की, कारकुनांनी साहेबाला खाणे, मतदारांनी मंत्र्याला खाणे अन् माहेरी परतणाऱ्या कथांच्या लेखकांनी संपादकाला खाणे, हे हिंदुस्थानातली अन्नसमस्या सोडविण्याचे एक सुलभ साधन होऊ शकेल. शिवाय हे अन्न देशातल्या देशात इतके अमाप पिकते की, आयातीची कटकट नको. माझी खात्री आहे की, कोठलाही कारकून न्याहारीला सेक्शन ऑफिसर अन् जेवायला हेडक्लार्क मिळाला तर सुखी होईल. लेखकाने संपादक खाणे तर याहून अधिक फायद्याचे आहे. प्रथम म्हणजे बेमालूम रूपांतरित केलेली अन् स्वतःच्या ठळक नावाखाली पाठविलेली कथा परत करणाऱ्या संपादकाचा अपराध पोटात घालण्यापेक्षा प्रत्यक्ष संपादकालाच पोटात घालणे अधिक सोपे असते. दुसरे म्हणजे दररोज नवनवीन पैदा होणाऱ्या मराठी मासिकांचे संतति-नियमन साधायचे असेल तर हा एकच उपाय शिल्लक राहिला आहे. अन् मतदारांनी मंत्री खाणे ही तर आजची निकडीची राजकीय गरज म्हणता येईल. कोठलेही सरकार आपल्याला आवडेनासे झाले की, त्याला उलथून पाडण्याचा लोकशाही उपद्व्याप करीत बसण्यापेक्षा जाहीर मेजवानीत सगळे मंत्री खाऊन टाकले की प्रश्न मिटला.

## ◻ बौद्धिक हातरुमाल

वायलची साडी अन् जॉर्जेटची साडी हे साड्यांचे प्रकार मला ठाऊक आहेत. इतकेच नव्हे तर वायलच्या साड्यांत फुलवायल व सेमी-फुलवायल, अन् जॉर्जेट-मध्ये ट्विकल जॉर्जेट अन् नायलॉन जॉर्जेट असले सूक्ष्म भेदही माझ्या कानावरून ओझरते गेलेले आहेत. पण परवा एक जाहिरात पाहिली त्यातही बाई म्हणे 'बौद्धिक साडी' नेसली होती ! मी बराच वेळ त्या चित्राकडे बारकाईने पाहिले, पण त्या साडीच्या बौद्धिकतेचा माझ्या अल्पबुद्धीला बोध झाला नाही. खरं म्हणजे बौद्धिक साडीपेक्षा आज बौद्धिक चड्डीची जास्त जरूरी आहे, कारण चौथीच्या परीक्षेत चार वर्षे ओळीने नापास होणारा आमचा छोट्या पुढे सरकायचा असेल तर हा एकच तरणोपाय आहे. स्पष्ट सांगायचे म्हणजे अस्मादिकांजवळही एखादा बौद्धिक कोट असता तर थर्ड क्लास बी. ए. पेक्षा काहीतरी अधिक पदरी पडले असते. बरं, बौद्धिक साडीवर मॅचिंग ब्लाऊज कोठला – मानसिक की हार्दिक ? अन् फक्त साडीच बौद्धिक की स्कर्टदेखील ? स्कर्टदेखील बौद्धिक असेल तर स्कर्ट आणि मिनिस्कर्ट यांच्यातला बौद्धिक फरक कवी अन् किंचित् कवी यांच्यातल्या फरका सारखाच समजायचा का ? बाकी ही बौद्धिक कपड्यांची फॅशन हल्लीच्या विद्यार्थ्यांना नक्कीच आवडेल. कारण दंगेधोपे करून मिळालेल्या फुरसदीत बौद्धिक रुमालाने तोंड पुसले की परीक्षा पास !

◻ ◻ ◻

आधुनिक विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

# मानवी मन

जगात किती विलक्षण गोष्टी घडत असतात. रस्त्याने जाताना दोन डोळे दुसऱ्या दोन डोळ्यांना जाऊन भिडतात, आणि त्यानंतर दोन जीव कायमचे हरवून बसतात ! मोठ्या उमेदीने लिहावयास बसलेल्या एखाद्या साहित्यिकाची तंद्री बघता बघता बिघडून जाते. पुढे अनेक दिवस तो लेखणीला हातच लावत नाही. ध्यानी-मनी नसताना एखाद्या शास्त्रज्ञाला एखादी लोकविलक्षण कल्पना सुचते. कारण नसताना तो काही चमत्कारिक संशोधन करीत बसतो, आणि त्या संशोधनाबद्दल त्याला नोबेल पारितोषिकसुद्धा मिळून जाते—या साऱ्या घटना का घडतात ?


मानवी मन म्हणजे काय ? भावना म्हणजे काय ? बुद्धिमत्ता म्हणजे काय ? परग्रहावर जाऊन पोचण्याइतपत तांत्रिक प्रगती केलेला माणूस या मूलभूत प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे द्यावयास कालपरवापर्यंत गांगरत होता. पण या साऱ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळू शकतील असे काही वेगळे संशोधन डॉ. रॉबर्ट मायर या तरुण संशोधकाने नुकतेच हातावेगळे केले आहे.

प्युरड्यु विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या या पस्तीस वर्षे वयाच्या तरुणाने एक अभिनव प्रयोग केला. मेंदूच्या खालच्या पृष्ठभागावर मध्यभागी 'हायपोथलमस' नावाचा एक लहानसा ठिबका असतो. या ठिबक्याचे नक्की काम काय असते हे शास्त्रज्ञांना आजपर्यंत माहित नव्हते. डॉ. मायर यांच्या प्रयोगाप्रमाणे या हायपोथलमसमध्ये असलेला हा द्रव पदार्थ (सी. एस्. एफ्) हा अनेक मानवी भावनांचे नियंत्रण करतो. ही महत्त्वाची गोष्ट सिद्ध करण्यास डॉ. मायर यांनी एक साधा प्रयोग केला. डॉ. मायर यांनी दोन गोरिला घेतले त्या दोन्ही गोरीलांचे हायपोथलमस एका छोट्या रबरी नळीने त्यांनी एकमेकांना जोडले. त्यानतर एक पंप वापरून गोरिला क्रमांक एकच्या हायपोथलमसमधील 'सी. एस्. एफ्.' हा द्रव त्यांनी गोरिला क्रमांक दोनच्या हायपोथलमसमध्ये पाठविला. आणि त्यानंतर डॉ मायर यांना अनेक मजेशीर गोष्टी पाहावयास मिळाल्या.—गोरिला क्रमांक एकच्या अनेक भावना आता गोरिला क्रमांक दोनला मिळाल्या होत्या. समजा, प्रयोगाला सुरुवात करण्यापूर्वी गोरिला क्रमांक एकला खूप तहान लागलेली आहे. गोरिला क्रमांक दोनला अजिबात तहान लागलेली नाही. पण एकदा का गोरिला क्रमांक एकचे 'सी. एस्. एफ्.' गोरिला क्रमांक दोनच्या हायपोथलमसमध्ये गेले, की त्याला खूप

तहान लागेल. तो पुन्हा पुन्हा पाणी प्यावयास मागेल. भूक, झोप वगैरे गोष्टींच्या-बाबतही हाच अनुभव येईल. डॉ. मायर यांनी आणखीही एक अनुभव नमूद केला आहे – या ' सी. एस्. एफ्.'च्या बदलानंतर गोरिला क्रमांक दोन चक्क गोरिला क्रमांक एकच्या प्रेयसीच्या प्रेमात पडला.

वरवर विसंगत वाटणारी एक गोष्ट डॉ. मायर यांच्या प्रयोगात आढळून आली. गोरिला क्रमांक एकच्या खोलीचे तपमान त्यांनी शून्याखाली दहा अंशापर्यंत खाली नेले. गोरिला क्रमांक एक थोड्याच वेळात थंडीने गारठून गेला. मात्र अशावेळी गोरिला क्रमांक दोन थंडीने गारठण्याऐवजी त्याचे तपमान झपाटयाने वाढून त्याला ताप आला. याउलट गोरिला क्रमांक एकच्या खोलीचे तपमान चाळीस अंशापर्यंत वाढविल्यास गोरिला क्रमांक दोन मात्र इकडे थंडीने गारठून गेला. डॉ. मायर यांच्या मते या गोष्टी विचित्र नाहीत किंबहुना याच गोष्टी अपेक्षित आहेत ! कारण गोरिला क्रमांक एकला ज्यावेळी फार थड वातावरण मिळू लागले त्यावेळी त्याचा प्रतिकार करण्यासाठी शरिराचे तपमान वाढवा अशी चळवळ 'सी. एस् एफ्.'ने सुरू केली. पण त्याचवेळी हे ' सी एस. एफ.' गोरिला क्रमांक दोनच्या शरिरात गेले होते. त्यामुळे तपमान वाढले गोरिला क्रमांक दोनचे !

यापुढचं डॉ. मायर यांचे काम बरेच अवघड आहे. ' सी. एस. एफ्.'चे नक्की रासायनिक पृथक्करण त्यांना करावे लागेल. एखादी विशिष्ट भावना सांगणारे ' सी. एस. एफ.' जतन करून ठेवता येते का ? ' सी. एस्. एफ.' कृत्रिम प्रकारे तयार करता येते का ? ' सी. एस्. एफ.' वर इष्ट बदल घडवून आणणाऱ्या रासायनिक गोळ्या तयार करून मानवी विकारांचे नियंत्रण करता येते का ? हे व असे अनेक प्रश्न मायर व त्यांच्या सहकाऱ्यांना यापुढे सोडवावे लागतील.





डॉ. मायर यांचा प्रयोग

# भारत आणि विज्ञान....

डॉ. हाल्डन म्हणजे विज्ञान क्षेत्रातले डॉ. लोहिया. असामान्य बुद्धिमत्ता, कडवेपणा आणि कडवटपणा हे त्यांचे गुणविशेष. रसायन, जीवशास्त्र आणि गणित हे त्यांच्या खास आवडीचे विषय. खाजगी जीवनात प्रेमळ आणि मिस्कील म्हणून माहिती असलेले डॉ. हाल्डन आपल्या संशोधनाच्या आड येणाऱ्या कोणाचाही मुलाहिजा ठेवत नसत. हाल्डन केंब्रिज विद्यापीठात विभागप्रमुख असताना, त्यांच्या विभागाला विद्यापीठाने फार कमी आर्थिक साहाय्य दिले. हाल्डन यांनी आपल्या वर्षाच्या पगारातील अर्धा भाग कुलगुरूंकडे पाठवून दिला. त्यांना कळविले, "माझ्या पगाराच्या मानाने माझ्या विभागावर होणारा खर्च फार कमी आहे. कृपया माझ्या पगाराचा हा भाग माझ्या विभागावरच्या खर्चात समाविष्ट करा!"

डॉ. हाल्डन यांनी भारतावर खूप प्रेम केले. स्वातंत्र्यानंतर ते भारतातच स्थायिक झाले होते. पण भारतीय तरुणांनी डॉ. हाल्डन यांचा अपेक्षाभंग केला. आयुष्याच्या अखेरीच्या दिवसात भारतीय तरुणांना उद्देशून ते म्हणाले, "तुम्ही खूप हुषार आणि बुद्धिमान आहात. भारतीय तरुण बुद्धिमान नाहीत असे मी कधीच म्हणणार नाही. पण अंगमेहनत आणि सातत्य या दोन गोष्टींना तुम्ही पारखे झाला आहात. तुमच्या संशोधनातला अमूल्य वेळ वृत्तपत्रीय बातम्यांची चर्चा करण्यात आणि गप्पाटप्पा मारण्यात तुम्ही दवडता आहात. तुमच्या जीवनातला समतोल ढळला आहे. तुम्ही कारण नसताना फार सहिष्णु आहात. सहकाऱ्यांवर वा वरिष्ठांवर योग्य टीका करावयाला तुम्ही गांगरता. दोन भारतीय शास्त्रज्ञ एकमेकांवर वैचारिक प्रहार करताना कधीच आढळत नाहीत. या संदर्भात तुम्हा तरुणांना मी एक खाजगी गोष्ट सांगतो. काही वर्षांपूर्वी माझ्या अमेरिकन पत्नीने जागतिक जीवशास्त्र परिषदेत एक प्रबंध वाचला. अनेक अमेरिकन शास्त्रज्ञांनी माझ्या बायकोच्या विचारांचा खरपूस समाचार घेतला. घरी आल्यावर माझी बायको खूप आनंदात होती. ती म्हणाली, 'मी मांडलेले विचार, विचार करण्याच्या योग्यतेचे आहेत हे आज सिद्ध झाले आहे. आज मी खऱ्या अर्थाने शास्त्रज्ञ बनले आहे!' मला वाटते माझ्या या विचारातून तुम्ही तरुण खूप काही शिकू शकाल. तसे काही शिकलात तर तुम्हाला फार मोठा भविष्यकाळ आहे...पण मी असली काही आशा आज बाळगत नाही!"

# छोटी गाडी




जागतिक हक्क नोंदवताना
डोरिथाने सादर केलेले कल्पनाचित्र

संशोधनक्षेत्रात केवढे मजेशीर शोध लागत असतात. भारतात ' छोटी गाडी ' राजीवच्या कृपेने जेव्हा येणार असेल तेव्हा येवो ! अमेरिकेत मात्र एक वेगळ्या स्वरूपाची छोटी गाडी बाजारात आणण्याचे प्रयत्न एका युवतीने चालवले आहेत. त्या युवतीचे नाव आहे कुमारी डोरिथा विडस्नेर. सत्तावीस वर्षे वयाच्या डोरिथाने एक नवी कल्पना पुढे मांडली आहे. एखाद्या विक्रेत्याला सामान बरोबर घेऊन अनेक मैल हिंडावे लागते. रेल्वे स्टेशनवर वा विमानतळावर हमालाची वाट पहात आपणाला थांबावे लागते. ' पुणेरी टांगेवाला ' इतिहासजमा झाला असला तरी या ना त्या स्वरूपात त्याचा अनुभव आपणाला प्रत्येक नव्या गावात घ्यावा लागतोच– डोरिथाने सुचविलेली स्कूटर वा सायकल आपण वापरली तर या साऱ्या त्रासातून आपली सुटका होईल. डॉ. डोरिथाने सुचविलेल्या स्कूटरमध्ये भरपूर सामान ठेवण्याची सोय असेल. किंबहुना तुमच्या ट्रंक वा वळकटीच्या उरलेल्या भागाला दोन चाके जोडूनच एक सायकल वा स्कूटर बनविली जाईल.

जागतिक हक्क क्रमांक ३, ३१६, ३९३ प्रमाणे आपल्या संशोधनाचे जागतिक हक्क कुमारी डोरियाने नुकतेच नोंदविले आहेत. तुमच्या दोन ट्रंकांच्या मधल्या भागात सायकल वा स्कूटरचे यंत्र असेल. ट्रंका व स्कूटरची चाके सहजपणे काही मिनिटात एकमेकांपासून अलग करता येतील. किंबहुना प्रवासात तुमच्या ट्रंक वा वळकटीच्या एका कोपऱ्यात हे सारे सामान ठेवलेले असेल. रेल्वे स्टेशनवर आल्यावर तुमची स्कूटर वा सायकल तुम्ही तयार कराल आणि नियोजित स्थळी जाल. डोरिथाने नुकताच युरोप व अमेरिकेचा प्रवास केला होता. त्या प्रवासात तिला ही कल्पना सुचली. प्रवासात या कल्पनेशी मिळती जुळती एक स्कूटर तिने वापरलीदेखील होती. स्वयंपाकघरात उपयोगी पडतील असे अनेक छोटे शोध डोरिथाने यापूर्वी लावलेले आहेत आणि आपला हाही शोध लवकरच बाजारात येईल याची डोरिथाला खात्री आहे.

□ □ □



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१० ते १६ जानेवारी १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रह मेष राशीला शुभफलदायी आहेत. शनिवारी व रविवारी मंगळ – चंद्र अकरावे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना यश मिळेल. अचानक धनलाभ होईल. नोकरीच्या प्रयत्नात असलेल्यांना नोकरी मिळेल. सोमवारी-मंगळवारी थोडेसे गृहस्वास्थ्य बिघडेल. गुरुवारी व शुक्रवारी समारंभात भाग घेण्याचा योग आहे. च, ल, र, त, अ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही हीच फळे मिळतील. या राशीच्या माणसांना सार्वजनिक कार्यात यशलाभ होईल.

शुभ तारखा १०, ११, १५, १६.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला त्रासदायक आहे. शनी बारावा, राहू – मंगळ दहावे, गुरू सहावा व शेवटी ता. १५।१६ ला चंद्रही बारावा होत आहे. या ग्रहस्थितीत पैसा, मानसन्मान, मनस्वास्थ्य या बाबतीत अपेक्षाभंग होणार आहे. त्यातल्या त्यात १५।१६ ला मंगळ – शुक्र चांगले होत असल्यामुळे स्त्रियांकडून आयत्यावेळी मदत होईल व अडचणी दूर होतील. प्रसाधने, अलंकार व चैनीच्या वस्तू विकणाऱ्या व्यापाऱ्यांना भरपूर फायदा होईल. अडचणी दूर होण्याकरिता दररोज गायत्री मंत्राचा १०८ जप करावा. सार्वजनिक कामात यश प्राप्त होईल. ज्यांची नावे व, ब, आ, इ, उ, ए या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १२, १३, १५, १६.

**मिथुन** : या सप्ताहात मिथुन राशीला सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. शिवाय चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून अत्यंत शुभ आहे. ३६ चे पुढे वय असलेल्या नोकरांना, व्यापाऱ्यांना त्याचप्रमाणे १३ ते १९ वयाच्या विद्यार्थ्यांना सर्व बाबतीत यश प्राप्त होईल. प्रवासामुळे प्रचारकांचा अमाप फायदा होईल. १५।१६ तारखांना अचानक धनलाभ होईल. वायदेबाजार करणाऱ्या लोकांनी या तारखांचा जरूर

फायदा मिळवावा. सर्व आठवडा शुभ फल देणारा आहे. क, प, द, ध, फ, झ, ञ, भ, छ, घ, थ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. या सप्ताहात यश, संपत्ती व कीर्ती या तिहींची प्राप्ती होईल.

शुभ तारखा १० ते १६ सर्व.

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान कर्कराशीला मिश्र फल देणारे आहे. ता. १०।११ अशुभ आहेत. अष्टमात मंगळ, राहू व चंद्र हे आहेत. यामुळे द्रव्यहानी होईल. संततीला आजारपण येईल. दशमातील शनी नोकरीत खटके घडवून आणील. या सर्व परिस्थितीवर चतुर्थातील गोचरी गुरू मात करील. त्यातल्यात्यात १२।१३।१४ तारखा बऱ्या आहेत. प्रवासात फसगत होईल. नवीन भागीदारी फलदायी होईल. वाहतुकधंद्यातील लोकांचे व कमिशन एजंट्स्चे जास्त नुकसान होईल. ज, स, ख, ह, ड, ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरील-प्रमाणे फळे मिळतील.

अशुभ तारखा १०, ११, १५, १६.

सिंह : या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला मिश्र फळ देणारे आहे. चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून होत आहे. पहिल्या दोन दिवसात भागीदारांशी मतभेद होईल. घरात धुसफूस होईल. मानसिक अस्वस्थता व संशय यांनी फार त्रास होईल. द्रव्याची तारांबळ उडेल. बुध-शुक्र शुभ असल्यामुळे अडचणीतून सुखरूप बाहेर पडता येईल. ता. १५ ला मंगळ अष्टमात येतो आहे. तो फारच त्रासदायक आहे. तो आठवा आहे तोपर्यंत कोणतेही काम तो जमू देणार नाही. घरातील आजारपणाकरिता अचानक खर्च होईल. नातलगांकडून आयत्या वेळी मदत होईल. ज, स, ख, ह, ड, ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्या व्यक्तींनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा ११ व १२

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला शुभफलदायी आहे. सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. दुसरा गुरू, पाचवा रवी (१३ तारखेनंतर), चवथे बुध, शुक्र, सहावे राहू-मंगळ हे सर्वच ग्रह चांगले आहेत. शत्रूंचा नाश होईल. धनस्थिती उत्तम राहील. घराचे व्यवहार चालू असतील त्यात फायदा मिळेल. प्रवासयोग येईल. शनी अष्टमातून धनस्थानावर पाहात आहे. त्यामुळे ता. १५।१६ ला विना-कारण कलह उत्पन्न होतील. अचानक धनलाभ होईल. व्यवहारातील येणे अन-पेक्षितपणे येईल. एकंदरीत सर्व सप्ताह शुभफलदायी आहे. क, प, द, ध, च, फ, झ, ञ, भ, छ, थ, घ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला शुभ फलदायी आहे. पाचवे मंगळ-राहू, पहिला गुरू, सातवा शनी, तिसरा रवी हे सर्वच ग्रह चांगले आहेत. ता. १३ नंतर रवी-शनी केंद्रयोग होत आहे. तो थोडासा त्रासदायक आहे. घरात थोडे मतभेद होतील. द्रव्यलाभ चांगलाच होईल. घरात काही शुभ समारंभ होईल. घरबांधणीचा पाया घालण्याचा योग येईल. पराक्रमाने अत्यंत बिकट अडचणींतून बाहेर याल. आर्थिक अडचण निवारण होईल. ता. १०।११।१२ फार चांगले दिवस आहेत. ता. १५।१६ ला शुक्र मकरेत व मंगळ मीनेत जात आहे. तो चांगलाच जाईल. शत्रुनाश होईल. सार्वजनिक कामात भरघोस यश येईल. च, ल, र, त आणि ब या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

शुभ तारखा १०, ११, १२, १५, १६

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला अशुभ फलदायी आहे. शत्रूकडून त्रास, सुखनाश व द्रव्यहानी होईल. पुष्कळ अनपेक्षित खर्च निघतील. शेवटचे दोन दिवस मानसिक त्रास फार होईल. मनाविरुद्ध घटना घडतील. संततीशी विरोध होईल. विद्यार्थ्यांना अपयश संभवते. त्यातल्यात्यात १२ व १३ तारखा चांगल्या आहेत. प्रवासाने फायदा होईल. २७ ते ३२ वयातील तरुण-तरुणींचे विवाह जमण्याचा योग आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांना त्यांच्या कामात टिकावू यश प्राप्त होईल. न, य, व, ब, आ, या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. अशुभ फळे नाहीशी होण्याकरिता देवीची आराधना करावी.

धन : या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला अत्यंत शुभकारक फल देणारे आहे. पाचवा शनी, तिसरे मंगळ-राहू, अकरावा गुरू, पहिले रवी-बुध-शुक्र असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. धनलाभ व सन्मान भरपूर मिळेल. मनातील हेतू पूर्ण होतील. मित्रांकडून फार मोठ्या प्रमाणात मदत होईल. प्रवासाचे बेत ठरतील. प्रवासात सर्व बाजूंनी भरपूर फायदा होईल. मानमान्यता मिळेल. ता. १५ ला शुक्र मकरेत व मंगळ मीनेत जात आहे. यामुळे कलेत, विशेषकरून चित्रकलेत नावलौकिक प्राप्त होईल. नवीन व्यवसाय हाती घेतल्यास त्यात यश येईल. नोकरीत व सरकारी अगर सहकारी कामात यश येईल. क, प, द, ध, फ, ज्ञ, ह्म, भ, छ, घ, थ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

मकर : या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला मिश्र फल देणारे आहे. दशमातील गुरू सर्व संकटातून सोडवील. सरकार दरबारच्या कामात ता. १४ पर्यंत

वाईट आहे. कोर्टातील तारखा पुढे घ्याव्या. बौद्धिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना अपयश येईल. हातून लिखाण होणार नाही. प्रत्येक काम लांबणीवर पडेल. मिळकतीपेक्षा खर्च जास्त होईल. घरात भांडणे होतील. चवथा शनी सुखनाश करील. हलक्या धंद्यातून अगर लॉटरीतून पैसा मिळेल. चंद्राचे गोचरीभ्रमण दोन, तीन, चार स्थानातून आहे. त्यात धनप्राप्ती चांगली होईल. मित्रांकडून मदत तर नाही, पण चालू कामात व्यत्यय येईल. ज, स, ख, ह, ज, म, श, म, ट, ठ या अक्षरांनी ज्यांच्या नावांची सुरुवात असेल त्या व्यक्तींनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

कुंभ : या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला बरे आहे. नववा गुरु, तिसरा शनी, मंगळ-राहू पहिले, हे सर्व ग्रह शुभ आहेत. ३६ वयाच्या पुढे असलेल्या व्यक्तींना शनी-राहू वाईट फळे देणार नाहीत. बाकीच्या व्यक्तींना मानसिक यातना, प्रयत्नात अपयश वगैरे फळे मिळणारच. यादृष्टीने शुक्रवार, शनिवार जास्त वाईट जातील. या राशीची माणसे आत्मघातकी विचाराची असतात. बुद्धियुक्त धंद्यात अमाप फायदा होईल. परीक्षा यशस्वी होईल. काही शास्त्रीय लिखाण लिहावयाचे असल्यास हा काळ चांगला आहे. या राशीची माणसे घरच्या लोकांशी तुसडेपणाने वागतात. हे दोष जाण्याकरिता दररोज शंकराचे दर्शन घ्यावे. बीजेच्या चंद्राचे न चुकता दर्शन घ्यावे. ज, स, ख, ह, ड, ग, श, म, ट, ठ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

सर्व सप्ताहच चांगला आहे.

मीन : या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला अशुभ फल देणारे आहे. बारावे राहू-मंगळ, आठवा गुरु दुसरा शनी हे सर्वच ग्रह अशुभ असून धन, मानमरातब, मोठेपणा या सर्वांना कमीपणा आणणारे आहेत. सार्वजनिक कामात अपयश. फक्त ता. १३ पर्यंत रवी-बुध दहावे आहेत. त्यानंतर रवी अकरावा होत आहे. त्यामुळे प्रत्येक अडचणीतून सुटका होईल. सरकारी नोकरीत असलेल्यांना बिलकुल त्रास होणार नाही. व्यापाऱ्यांना भांडवलाची अडचण फार येईल. पत जाते की काय असे वाटेल; पण सार्वजनिक संस्था व सरकारच्या मदतीने त्यातून पार पडता येईल. या राशीच्या लोकांना इतरांबद्दल अत्यंत सहानुभूती असते व त्याचेच फळ म्हणून त्यांना दुःख सहन करावे लागते. क, प, द, घ, च, फ, झ, ज्ञ, भ, छ, घ, थ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील.

अशुभ फळे कमी होण्याकरिता गायत्री मंत्राचा जप करावा. □ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. प. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No: M H-649



"तरी तुम्हाला सांगत होते, एक सिंडिकेटला तरी जाऊन मिळा नाहीतर इंडिकेटला तरी. एकाच वेळी दोघांवर लक्ष ठेवायला गेलात, त्याचा हा परिणाम, बरं! आता नेत्रवैद्य तरी काय करणार? ..."